सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १३ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







## नटराजन यांना सर्वोच्च न्यायालयाकडून झटका

नवी दिल्ली : नटराजन यांच्या तक्रारीत प्रथमदर्शनी काही तथ्य आढळल्यानंतरच दंडाधिकारी न्यायालयाने समन्स जारी करायला हवे होते, अशी निरीक्षणे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि अतुल चांदुरकर यांच्या खंडपीठाने नोंदवली. नटराजन यांचे प्रतिनिधित्व करणारे अभिषेक मनु सिंघवी यांनी आपल्या युक्तिवादात सांगितले की, नटराजन यांचा जय किंवा पराजय हाच निर्णायक घटक ठरला असता. या प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाचे मौन आश्चर्यकारक आहे.

## 'शासन आपल्या दारी' पुरस्कार पोस्टवर नाराजीच्या प्रतिक्रिया

रायगड : तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला मिळालेल्या स्कॉच पुरस्काराबाबत सोशल मीडियावर माहिती दिल्यानंतर त्यावर विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. अनेकांनी पुरस्काराबद्दल अभिनंदन केले असले तरी काही नागरिक, कंत्राटी कर्मचारी आणि आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी सरकारच्या अपूर्ण आश्र्वासनांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## काँग्रेस बुडते जहाज, त्यात कोणीच पाय ठेवणार नाही : मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा



मुंबई : काँग्रेस हे सध्या बुडते जहाज आहे आणि विरोधी पक्षांमधील नेते इतके हुशार आहेत की ते या बुडत्या जहाजात कधीच पाय ठेवणार नाहीत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेचा समाचार घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला यशस्वी १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाच्या चर्चांवर खोचक टिप्पणी करत उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनाही लक्ष्य केले. 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' अशी राऊत यांची अवस्था असल्याची चपराक त्यांनी लगावली.

विलीनीकरणाच्या सुरू असलेल्या चर्चांवर मुख्यमंत्री म्हणाले, अतिशोयक्तीपूर्ण बोलणे राजकारणात योग्य नसते. परंतु, विरोधी पक्षांनी जर काँग्रेसमध्ये विलीनीकरण केले, तर त्याचा फायदा भारतीय जनता पक्षालाच होणार आहे. यामुळे आम्हाला अधिकची 'पॉलिटिकल स्पेस' उपलब्ध होईल. विरोधी पक्ष जेवढा मागे हटेल, तेवढी अतिरिक्त स्पेस भाजप काबीज करेल. त्यामुळे या घडामोडींवर आमची 'वेट अँड वॉच'ची भूमिका आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशात ३६० अंशाचा बदल घडवून आणल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारच्या विकासकामांची जंत्रीच पत्रकार परिषदेत मांडली. गेल्या १२ वर्षांत मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही डाग लागलेला नाही. या काळात २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आली आहे. देशात आतापर्यंत ३ कोटी 'लखपती दीदी' झाल्या असून, आगामी काळात हा आकडा ६ कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# ट्रम्प यांच्या दाव्यांवरून मोठा संभ्रम, युद्ध थांबणार की भडकणार?

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : अमेरिका आणि इराणमधील यद्ध एका अत्यंत संवेदनशील वळणार पोहोचले असून, गुरुवारी घडलेल्या नाट्यमय घडामोडींमुळे संपूर्ण जग चक्रावून गेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकीकडे युद्ध तात्काळ थांबून शांतता करार यशस्वी होत असल्याचा दावा ककरत आहेत, तर दुसरीकडे प्रत्यक्ष परिस्थिती पाहता युद्धाचा धोका आधीपेक्षा कितीतरी पटीने वाढल्याचे दिसत आहे. ट्रम्प यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे आतंरराष्ट्रीय पातळीवर मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

गुरुवारी सकाळी कमांडर-इन-चीफ डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या खार्ग वेट या मुख्य तेल निर्यात केंद्रावर थेट लष्करी हल्ला करण्याची आणि तिथे घुसण्याची उघड धमकी दिली. हा लष्करी थरार झाला असता, तर अनेक अमेरिकन सैनिकांचे प्राण धोक्यात येऊ शकले असते आणि जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला असता. पण अवघ्या काही तासातच ट्रम्प यांनी ओव्हल कार्यलयातून अमेरिका आणि इराण यांच्यात एका सामंजस्य करारावर शिक्कामोर्तब होणार असून, युद्ध थांबण्याच्या उंबरठ्यावर आहे. ट्रम्प यांनी हा करार थोडा विचार करायला लावणारा आहे असे म्हटले, ज्यामुळे संभ्रम अधिक वाढला आहे.

दरम्यान, अमेरिकेच्या बायडेन प्रशासनात हवाई दलाचे सचिव राहिलेले फ्रँक केंडल यांनी सीएनसीएनशी बोलताना सांगितले की, ट्रम्प यांच्या या दाव्यांकडे फार गांभार्याने घेण्याची गरज नाही. हा युद्ध संपवणारा कोणताही अंतिम करार नाही. हा केवळ पुढील ६० दिवसांसाठी युद्धविराम वाढवण्याचा एक प्रयत्न असू शकतो, जेणेकरून इराणच्या अणू कार्यक्रमावर पुढील चर्चा करता येईल.



दुसरीकडे, अमेरिकेतील उजव्या विचारसरणीचे रिपब्लिकन नेते आणि फॉक्स न्यूज वृत्तवाहिनीचे विश्र्लेषक मार्क लेविन यांनीही ट्रम्प यांना घेरले आहे. ते म्हणाले, 'जोपर्यंत हा करार अधिकृतपणे समोर येत नाही आणि पुढील ४८ ते ७२ तासात त्यावर स्वाक्षऱ्या होत नाहीत, तोपर्यंत ट्रम्प यांच्या दाव्यांवर विश्र्वास ठेवता येणार नाही.'

दरम्यान, इराणसोबत सुरू असलेल्या या युद्धात आतापर्यंत १३ सैनिकांचा मृत्यू झाला आहे, तर कोट्यवधि डॉलर्सची लष्करी शस्त्रे आणि विमान उद्ध्वस्त झाली आहेत. या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे अमेरिकन जनताच ट्रम्प यांच्या विरोधात जाऊ लागीली आहे. आता 'माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी २०१५ मध्ये इराणसोबत केलेला ऐतिहासिक अणू करार ट्रम्प यांनी २०१८ मध्ये स्वतःच्या हट्टापायी मोडीत काढला होता. मग एवढे युद्ध करून, निष्पापांचे बळी घेऊन त्यांना काय मिळणार आहे?', असा प्रश्न ट्रम्प यांना विचारला जात आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी असाही दावा केला आहे की, इराणच्या सर्वोच्च नेत्यांनी या कराराला मंजुरी दिली आहे. मात्र, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते एस्माईल बघाई यांनी ट्रम्प यांचा हा फुगा फोडला. इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेशी बोलताना बघाई म्हणाले की, 'अमेरिकेकडून येणारे अहवाल केवळ तर्कवितर्क आहेत. इराणने अद्याप कोणत्याही कराराबाबत अंतिम निर्णय घेतलेला नाही.

इराणची अर्थव्यवस्था आधीच अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांमुळे उद्ध्वस्त झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, इराणने या चर्चेसाठी अमेरिकेसमोर एक मोठी अट ठेवली आहे. परदेशी बँकांमध्ये अडकलेले इराणचे अब्जावधी डॉलर्स तात्काळ मुक्त करावेत, अशी इराणची मागणी आहे. जर ट्रम्प यांनी इराणला पैसे दिले, तर त्यांच्यावर स्वतःच्याच देशात मोठी नामुष्की ओढवू शकते; कारण ट्रम्प यांनी भूतकाळात ओबामांवर इराणला पैसे दिल्याचा आरोप करत जोरदार टीका केली होती.

ट्रम्प यांनी हे युद्ध इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यासोबत मिळून सुरू केले होते. आता मात्र दोघांमधील संबंध ताणले गेले आहेत. ट्रम्प यांनी इस्रायलला लेबनॉनमधील हिजबुल्लाहवरील हल्ले मर्यादित ठेवण्यास सांगितले आहे, जेणेकरून इराणसोबत करार करता येईल. नेतन्याहू यांनी म्हटले आहे की जोपर्यंत इराणचा अणू प्रकल्प पूर्णपणे नष्ट होत नाही आणि हिजबुल्लाहचा खात्मा होत नाही, तोपर्यंत इस्रायल शांत राहणार नाही.

इराण आणि अमेरिका यांच्यातला वाद भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे. ओमानच्या खाडीतील समुद्री मार्ग बंद झाल्यास, कच्च्या तेलाचा पुरवठा बंद होईल आणि महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलची किंमत खूप वाढेल, यामुळे महागाई वाढेल. युद्ध वाढल्यास, मुंबई शेअर बाजार कोसळेल आणि गुंतवणूकदारांना खूप नुकसान होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तिथे काम करणाऱ्या अनेक भारतीय आणि मराठी माणसांच्या सुरक्षेसाठी ट्रम्प यांचा शांततेचा दावा खरा ठरणे गरजेचे आहे.

# राज्यातील सर्व दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद

तभा वृत्तसेवा



मुंबई : महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली सर्वच्या सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परिणामी, ब्रिटिश काळापासून चालत आलेली आणि स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेली 'दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२' इतिहासजमा झाली आहे.

राज्यातील दुय्यम कारागृहांची सद्यःस्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एका विशेष अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटाने १० डिसेंबर २०२४ रोजी आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालावर अपर मुख्य सचिव (महसूल) आणि अपर मुख्य सचिव (गृह) यांच्यात ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत सखोल चर्चा झाली.

सध्या राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी तब्बल ८० कारागृहे आधीच बंद अवस्थेत पडलेली आहेत. तर उर्वरित ३६ कारागृहे तांत्रिकदृष्ट्या कार्यरत असली, तरी ती सुस्थितीत नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्र्वभूमीवर, गृह विभागाच्या अभिप्रायानंतर सरकारने ही सर्व दुय्यम कारागृहे कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला. या दुय्यम कारागृहांमध्ये सद्यस्थितीत दाखल असलेल्या कैद्यांना संबंधित जिल्ह्यातील जिल्हा कारागृह किंवा मध्यवर्ती कारागृहांमध्ये तातडीने रवानगी करण्याची जबाबदारी गृह (कारागृह) विभागाला देण्यात आली आहे.

या दुय्यम कारागृहांसाठी गृह विभागाची लिपिक संवर्गातील (वर्ग-३) एकूण ६ पदे मंजूर होती. ही पदे श्रीरामपूर (अहिल्यानगर), महाड (रायगड), मालेगाव (नाशिक), तळोदा (नंदुरबार), कराड (सातारा) आणि उदगीर (लातूर) या ठिकाणी मंजूर असून सद्यस्थितीत ती रिक्त आहेत. आता ही सर्व रिक्त पदे संबंधित कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालयाकडे वर्ग करण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले आहेत.

आजवर या दुय्यम कारागृहांच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी, कर्मचाऱ्यांचे वेतन, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क, कंत्राटी सेवा, आहार खर्च आणि कार्यालयीन खर्चासाठी गृह विभागामार्फत 'लेखाशीर्ष २०५६' अंतर्गत विशेष अर्थसंकल्पित तरतूद केली जात होती. आता ही कारागृहे बंद झाल्यामुळे पुढील आर्थिक वर्षापासून आर्थिक तरतूद बंद केली जाणार आहे.

## गुटखा, तंबाखू विरोधात थेट मकोका लागणार : तुकाराम मुंढे

तभा वृत्तसेवा



मुंबई : महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटीत्त अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज स्पष्ट आदेश दिले आहेत.

भारताच्या संविधानाच्या कलम ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची आणि आरोग्यास अपायकारक पदार्थांच्या सेवनास प्रतिबंध करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला आणि अशा प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ हे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारे आहेत. या पार्श्र्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३० (२) (अ) अंतर्गत राज्यात अशा पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिबंध असूनही काही ठिकाणी या पदार्थांचा अवैध व्यापार पद्धतशीर, संघटित आणि आर्थिक फायद्यासाठी होत असल्याचे अंमलबजावणी यंत्रणांच्या निदर्शनास आले आहे.

## शेअर मार्केटमध्ये तोटा, मुख्याध्यापकाने स्वत:सह कुंटूबालाही संपवलं

तभा वृत्तसेवा

सोलापूर : सोलापूरच्या बार्शी तालुक्यात मुख्याध्यापकाने शेअर मार्केटमध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याने कुटुंबासह सामूहिक आत्महत्या केली आहे. ही घटना बार्शी तालुक्यातील वैराग येथील हत्तीज येथे घडली आहे. मुख्याध्यापकाने दोन मुले, पत्नीला संपवून स्वतः ला संपवल्याने संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरला आहे. योगेश बाळासाहेब पाटील असं या मुख्यध्यापकाचे नाव आहे. योगेश पाटील यांना शेअर मार्केटमध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याने, त्यांनी अशाप्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. सामूहिक आत्महत्यामध्ये योगेश पाटील, पत्नी माधुरी पाटील, मुले अथर्व आणि शिवांश अशी मृतांची नावे आहेत.

बार्शी तालुक्यातील हत्तीज गावातील धक्कादायक घटना घडली आहे. योगेश बाळासाहेब पाटील हे नंदुरबार येथे जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. शेअर मार्केटमध्ये सातत्याने नुकसान होत गेल्याने त्यांना १ कोटी ८० लाख रुपये कर्ज झाले. या कर्जाच्या विवंचनेतूनच त्यांनी संपूर्ण कुटुंबासह आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

योगेश बाळासाहेब पाटील (वय ४१ वर्षे) यांनी आत्महत्या करण्या अगोदर २२ पानांत सविस्तर लिहिले आहे. शेअर मार्केटमध्ये कसा फायदा झाला, नुकसान कसा झाला, याबाबत योगेश पाटील यांनी सविस्तर लिहिले आहे. शेअर मार्केटमध्ये नातेवाईकांकडून उसने पैसे घेतले, ते परत करता आले नाही, त्याबाबत योगेश पाटील यांनी दुःख व्यक्त केले आहे.

कोट्यावधी रुपयांचे नुकसान सहन न झाल्याने योगेश पाटील यांनी सुरुवातील पत्नी माधुरी, अथर्व आणि शिवांश यांना विष पाजले, आणि स्वतः ही विष प्राशन करून गळफास घेत आत्महत्या केली आहे. वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी अधिकृतरित्या माहिती दिली आहे. सामूहिक आत्महत्येनंतर या संपूर्ण बार्शी तालुक्यावर आणि सोलापुरात शोककळा पसरली आहे.




लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : आजच्या वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक ताणतणाव, भावनिक समस्या, वर्तनात्मक अडचणी, सोशल मीडिया व डिजिटल व्यसन, करिअरविषयक संभ्रम, तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आणि त्यामुळे अनेक गंभीर घटना आणि समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही गरज आणि समस्या लक्षात घेऊन अमृत या संस्थेने ही सामाजिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी मार्फत अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (चखचक), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक भागीदार (TECHNICAL PARTNER) म्हणून कार्यरत राहणार आहे.



## विविध वृत्त...

### जिल्ह्यात उद्या ३२ परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१२ जून : जिल्ह्यात रविवार, १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ दरम्यान ३२ उपकेंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा-२०२६ आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात परीक्षेदिवशी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू केले आहे.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास किंवा शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक ही सर्व माध्यमे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन, सेल्युलर फोन किंवा इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल, तसेच कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. हे निर्बंध परीक्षा कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस प्रशासनास लागू नसून, परीक्षेचे कामकाज शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

### खाजगी ट्रॅव्हल्सचे मनमानी व्हीएस पँथर्स आक्रमक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : लातूर शहरातील खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून प्रवाशांची होत असलेली आर्थिक लूट आणि वाढती वाहतूक कोंडी याविरोधात व्हीएस पँथर्स युवा संघटना आक्रमक झाली आहे. खाजगी ट्रॅव्हल्सच्या मनमानी कारभाराला तातडीने चाप लावावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

व्हीएस पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, उन्हाळी व दिवाळीच्या सुट्टयांच्या काळात खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून सामान्य प्रवाशांकडून अवाजवी व मनमानी भाडे आकारले जाते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. याशिवाय सायंकाळी सहा वाजल्यानंतर शहरात मोठ्या प्रमाणात खाजगी ट्रॅव्हल्सची वाहने येत असल्याने मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत आहे. खाजगी ट्रॅव्हल्सची वाहने रस्त्याच्या कडेला व मुख्य मार्गावर उभी केली जात असल्यामुळे इतर वाहनधारकांसह स्थानिक वाहतूकदारांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने उपाययोजना न केल्यास व्हीएस पँथर्सच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

### तुळजाभवानी महाविद्यालयाचे सीईटी परीक्षेत घवघवीत यश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने या परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. कुलदीप कैलासराव झोल हा विद्यार्थी पीसीबी ग्रुपमध्ये ९८.५८ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम, कुलस्वामिनी कैलासराव झोल व जोहा जहाँगीर शेख या अनुक्रमे ९१.६० पर्सेंटाईल गुण घेऊन द्वितीय तर युवराज विष्णू मोहिते हा ८७ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात आला आहे. याबरोबरच आर्या श्रीमंत दोरवे हिने ८० पर्सेंटाईल गुण मिळविले आहेत. तृतीय या यशाबद्दल संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## लागवड केलेल्या वृक्षांपैकी किती वृक्ष जिवंत हे पहावे लागेल

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे



लातूर दि. ११ जून : जिल्हमात वन महोत्सव१५ जून ते ३० सप्टेंबर या दरम्यान साजरा केला जाणार असल्या कारणानी या कालावधीत३ लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे .

जिल्ह्यातील२५ रोप वाटिका मधून जवळपास८ लाख रोपे तयार केली गेली असून जिल्ह्यातील साखरा, गातेगाव आणि मुरुड या विभागांच्या जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जाणार आहे .

गेली दोन वर्ष चांगला पाऊस झाल्यामुळे साजरा, गातेगाव आणि मुरुड या विभागाच्या ४५ हेक्टर माळरानावर वृक्ष लागवड केली गेली होती तयार केलेल्या रोपांमधून अर्धी रोपे शासनाच्या वृक्ष लागवड मोहिमे साठी मोफत देण्यात येणार आहेत . बाकी रोपे ज्या नागरिकांन वृक्ष लागवड करायची आहे अशा नागरिकांना सवलतींच्या दरात देण्यात येणार आहेत .जिल्ह्यात अवघे दीड टक्के क्षेत्रांवर वृक्षाच्छादन आहे . ही बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मनावर घेऊन अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन वृक्षरोपणाच्या सूचना अधिकारी - कर्यचारी यांच्यासह शाळा - महाविद्यालयातील विध्यार्थ्यांना केल्या आहेत

यावेळी कमी पाण्यावर येणाऱ्या वृक्षांची रोपे तयार केली असून त्यात आंबा, चिंच, वड, पिंपळ, कडूलिंब, आवळा, करंज, सिताफळ, रामफळ, जांभूळ, रुद्राक्ष, माहगनी, हेडा, भेडा आणि बांबू यांचा समावेश आहे यामध्ये शेतकऱ्यांचा समावेश केला तर स्वार्थातून परमार्थ शोधल्या सारखे होईल . एकतर शेतकरी बांधावर, कमी पाण्यावर येणारी वृक्ष लावली तर त्यांना सावली तर मिळेलच पण या वृक्षापासून उत्पन्न ही मिळू शकेल आणि विशेष म्हणजे तो या मोहिमेचा एक भाग होईल . तसेच शाळा - महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी वर्गानी किमान एक वृक्ष लावले पाहिजे तसेच विविध सेवाभावी संस्था, फांऊडेशन, प्रतिष्ठाण आणि राजकीय पक्षातील कार्यकर्ते यांनाही वृक्ष लागवड करायला भाग पाडावे म्हणजे जिल्ह्यात वृक्षाच्छादनाचा भाग वाढून पुढे पावसाचे प्रमाण वाढत जाईल आणि भविष्यात पाणी टंचाई होणारच नाही

यात एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, आतापर्यंत किती वृक्षांची लागवड केली आणि वृक्ष जगले हे पहावे लागेल म्हणजे लागवड केलेल्या वृक्षापैकी किती वृक्ष जिवंत आहेत हे समजू शकेल . यातून पुढच्या वर्षी न जगलेल्या वृक्षांच्या जागी नवीन वृक्ष लावता येऊ शकतात ओसाड माळरानावर, रस्त्यांच्या दुतर्फा भागांवर, सरकारी जमिनी ज्या खुल्या आहेत, अश भागांवर, वाढदिवसा ला किंवा लग्नाला वृक्ष भेट द्यावे लागतील जेणेकरून वृक्ष लागवडीस हातभार लागेल . जिथे खुली जागा दिसेल तेथे वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे .

निवडणुकीत प्रत्येक मतदारांना एक वृक्ष भेट द्यावा, कोणत्याही समारंभात फुलांचा गुच्छ देण्यापेक्षा एका वृक्षाचे रोपटे द्यावे . अशा उपाय योजना केल्या तर दृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात होईल आणि त्यामुळे भविष्यात पर्जनमान चांगले राहिल फक्त वृक्ष लावले म्हणजे झाले, असे न करता लावलेला वृक्ष जिवंत कसा राहिल यासाठी त्याचे योग्य संगोपन, जतन करणे आवश्यक आहे . त्याशिवाय ते शक्य नाही आजकाल विविध कारणांसाठी वृक्ष तोड केली जात असल्याचे दररोज दिसत आहे . त्या ठिकाणी वृक्षांची लागवड केली जात नाही .त्यामुळे किमान वृक्ष तोडलेल्या प्रमाणात तरी नवीन वृक्ष लागवड करून भरपाई करणे गरजेचे आहे .

## आमदार चषक तिरंगा क्रिकेट क्लब मसला संघाने पटकावला
## यशस्वी संघांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बक्षीस वितरण

तभा वृत्तसेवा




लातूर दि. १२ जून : लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसला येथील तिरंगा क्रिकेट क्लब सर्वप्रथम विजेता ठरला असून या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत तब्बल ३२ संघाने सहभाग घेतला होता. यशस्वी संघांना लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रोख पारितोषिक, चषक, मेडल आणि सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, अशोक सावंत, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे आ. कराड यांनी कौतूक केले.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी प्रथम क्रमांक तिरंगा क्रिकेट क्लब मसला ३१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांक श्री गणेशा क्रिकेट क्लब कानडी बोरगाव २१ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषक कॉमन वेल्थ क्रिकेट क्लब बोरडा ११ हजार रुपये व चषक मॅन ऑफ द सिरीज राहुल राठोड, मॅन ऑफ द मॅच समाधान सोनटक्के बेस्ट विकेट किपर विजय आल्टे यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी अंकुश गणगे, संतोष गायकवाड, नरेंद्र अल्टे, रामहरी भिसे, सचिन कांबळे, नुरखॉ पठाण, विष्णू कसबे, बाबा नवगिरे, बिभीषण शिंदे, शैलेश कसबे यांच्यासह विजयी तिन्ही संघातील खेळाडू व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनसाखळी चोर महिलेस अटक



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत मध्यवर्ती बसस्थानक परिसरात महिलांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या एका सराईत महिला चोरट्यास गांधी चौक पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत चोरीस गेलेले ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. पोलिसांच्या तत्पर तपासामुळे हा गुन्हा उघडकीस आला आहे.

मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे फिर्यादी ह्या आपल्या आईला पुणे येथे जाणाऱ्या बसमध्ये बसविण्यासाठी दि. ९ जून रोजी रात्री ९.४५ वाजण्याच्या सुमारास बसस्थानकात आल्या होत्या. आईला बसमध्ये बसवून खाली उतरत असताना त्यांच्या आईने सुरक्षिततेसाठी त्यांच्याकडे दिलेले १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांचे नेतृत्वात तपास पथकाची नियुक्ती केली. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील उपलब्ध माहिती, तांत्रिक विश्र्लेषण, संशयितांची पडताळणी तसेच आलेल्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून अर्चना अजय भोसले (वय २६ रा. गावठाण माही, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हिला ताब्यात घेतले.

सखोल चौकशी दरम्यान आरोपी महिलेने बसस्थानक परिसरात फिर्यादीचे सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून चोरीस गेलेले १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

याचबरोबर आरोपीकडे अधिक तपास केला असता तिने गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल केला.

### आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप

लातूर दि .१२ जून : प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांनी मंगळवारी विविध मागण्यांसाठी एक दिवसीय संप पुकारला या आंदोलनात लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अंतर्गत असलेले एकूण६० कर्मचारी सहभागी झाले होते.

### कृषि महाविद्यालयातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : कृषि महाविद्यालय, लातूर येथे विद्यार्थी समुपदेशन व नियुक्ती कक्षाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पदव्युत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संतोष कांबळे, कृषी महाविद्यालय व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, जिरेवाडीचे प्राचार्य डॉ. दिनेशसिंह चव्हाण, विद्यार्थी समुपदेशन व नियुक्ती कक्षाचे डॉ. विजय भामरे, अमर साखरे उपस्थित होते.

नुकत्याच महाविद्यालयाच्या विद्यार्थी समुपदेशन व नियुक्ती कक्षामार्फत आयोजित करण्यात आलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या परिसर मुलाखतीद्वारे पदव्युत्तर विद्यार्थी सुशांत बिराजदार, पदवी विद्यार्थी गणेश पाटील, सौरभ गरुड, आदित्य गवळी, हर्षद घुगे, जानवी शिंदे आणि शुभम अंबुलगे यांची सहाय्यक प्रबंधक पदासाठी निवड झाली आहे.

तसेच शुभम जाधव, कौस्तुभसरवदे, ऋतुजा राऊत आणि रोहिणी पुरी या चार विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्यस्तरीय समर यूथ समिटमध्ये सहभाग घेऊन कोअर टीम सदस्य म्हणून सन्मान प्राप्त केला. तसेच या समिटमध्ये कृषि महाविद्यालय, लातूर येथील यांच्या उपक्रमांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. याशिवाय, टेक्नोसर्व या बहुराष्ट्रीय कंपनीच्या वतीने महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थी सुशांत बिराजदार, प्रथमेश अडसूळ, बालाजी सांगळे, महेश पवार, मोहन होगे आणि जीवन धोत्रे यांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. तसेच पदव्युत्तर विद्यार्थी विवेक हांडे यांची शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला. महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या 'टप्प्याटप्प्याने रासायनिक शेतीकडून एकात्मिक शेतीकडे' या प्रकल्पाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील फूड बज या नियतकालिकाने दखल घेत महाविद्यालयाच्या शाश्र्वत व एकात्मिक शेती क्षेत्रातील कार्याचा गौरव केला आहे. या उपक्रमात सहभागी असलेल्या आचार्य पदवीच्या विद्यार्थिनी प्रतीक्षा खेडक र व पदव्युत्तर विद्यार्थी सुशांत बिराजदार यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय भामरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. दयानंद मोरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजेश शेळके, डॉ. पद्माकर वाड-ीकर, डॉ. प्रभाकर अडसूळ, डॉ. सुनिता मगर, डॉ. अजित पुरी, डॉ. अमोल मिसाळ, सुधीर सदार, नामदेव कटिंग तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

### पोलिओ लसीकरण मोहिम २८ जून रोजी राबविणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : पाच वर्षा खालील बालक - बालिकांसाठी आरोग्य विभागच्या वतीने पोलिओ लसीकरण मोहिम येत्या२८ जून रोजी राबविण्यात येत असून या दिवशी एक बालक किंवा बालिका वंचित राहणार नाही याची दक्षता असे आवाहन जिल्हास्तरीय समन्वय समिती चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे .

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत विविध घटकांसाठी २२ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळितधान्य) सन २०२६-२७ अंतर्गत फ्लेक्झी फंड घटकातील विविध योजनांसाठी लातूर जिल्ह्यात अर्ज मागविण्यात येत असून, यासाठी २२ जून २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. या अभियानांतर्गत गोदाम बांधकाम व काढणी पश्र्चात पायाभूत सुविधांकरिता (तेलघाणा) ऑफलाईन, तर मिनी ऑइल मिल व एक्सपेलर या घटकासाठी 'महाडीबीटी' पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने शेतकरी, शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी आणि वैयक्तिक अर्जदारांना अर्ज करता येतील.

यातील गोदाम बांधकाम घटकासाठी सरकारी व खाजगी उद्योग, समूह आधारित व्यवसाय संस्था, शेतकरी उत्पादक संस्था किंवा कंपनी आणि सहकारी संस्थांना सहाय्य दिले जाणार असून यात सोयाबीन मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाईल. २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी येणाऱ्या अंदाजे २८ लाख ८० हजार २५० रुपये खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १४.४० लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. ही बाब बँक कर्जाशी निगडित असल्याने अर्जदाराने रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत वित्तीय संस्थेकडून (ज्या बँकेच्या शाखांना आयएफएससी कोड आहे) बँक कर्ज अनुदानाकरिता ग्राह्य धरून प्रकल्प सादर करणे आवश्यक असून, या घटकासाठी लातूर जिल्ह्याला ३ गोदामांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतासाठी काढणी पश्र्चात पायाभूत सुविधा (तेलघाणा) अंतर्गत १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढण्याच्या युनिट्सची (डिहलर, सीड क्लिनर, तेल काढण्याचे व गाळणी यंत्र) खरेदी व स्थापनेसाठी मदत दिली जाणार आहे. बीआयएस किंवा समकक्ष गुणवत्ता मानकांचे पालन करणारी आणि एकापेक्षा जास्त प्रकारच्या तेलबियांवर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेल्या या यंत्रसामुग्रीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान दिले जाईल. लातूर जिल्ह्याकरिता या घटकाचे १ उद्दिष्ट असून सरकारी व खाजगी उद्योग, वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी उत्पादक संस्था व नोंदणीकृत कंपन्यांना याचा लाभ घेता येईल.

याव्यतिरिक्त मिनी ऑइल मिल आणि एक्सपेलर या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी व मूल्य साखळी भागीदारांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. यात फिल्टर प्रेससह असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपये प्रति युनिट अनुदान अनुज्ञेय राहणार आहे. पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत आपले अर्ज दाखल करावेत, असे कृषी विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## गावठी पिस्टलसह आरोपी जेरबंद
### लातूर पोलिसांची अवैध शस्त्राविरोधातील धडक मोहीम शस्त्र पुरवठादाराविरोधातही गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या पथकाने केलेल्या धड क कारवाईत एका आरोपीस गावठी पिस्टल व मॅगझीनसह ताब्यात घेण्यात आले असून शस्त्र पुरवठा करणाऱ्या दुसऱ्या आरोपीविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक माने यांचे पथकाला १० जून रोजी सायंकाळी माहिती मिळाली की, एक इसम अनधिकृत गावठी पिस्टल बाळगून एलआयसी कॉलनी परिसरातील सुतमील झोपडपट्टी भागात संशयास्पदरीत्या थांबलेला आहे. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. पथकाने एलआयसी कॉलनी येथील सुतमील झोपडपट्टी परिसरात छापा टाकून संशयित इसमास ताब्यात घेतले. आकाश ऊर्फ मारी नवनाथ ऊफाडे (वय २६ वर्ष, रा. पळशी, ता. रेणापूर) असे असल्याचे निष्पन्न झाले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कमरेस एक गावठी पिस्टल व मॅगझीन आढळून आले. पोलिसांनी तात्काळ गावठी पिस्टल व मॅगझीन जप्त केला. पुढील चौकशीत आरोपी आकाश ऊफाडे याने हे गावठी पिस्टल नानासाहेब अर्जुन ऊफाडे, रा. पळशी, ता. रेनापुर याच्याकडून ४५ हजार रूपयांमध्ये विकत घेतल्याची माहिती दिली. त्यानुसार शस्त्र पुरवठादाराविरोधातही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी आकाश ऊर्फ मारी नवनाथ ऊफाडे व नानासाहेब अर्जुन ऊफाडे या दोघांविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ३(१)/२५ अन्वये पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अवैध शस्त्र बाळगणे, विक्री करणे अथवा त्यांचा वापर करणे ही गंभीर स्वरूपाची बाब असून अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध लातूर पोलीस दलाची कारवाई यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### २८ जून रोजी जिल्हाभर राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

### शून्य ते पाच वर्षांतील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये; जिल्हास्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** माझं गाव आरोग्य संपन्न गाव या संकल्पनेतून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी जिल्ह्यातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परभणी जिल्हा परिषद येथे गुरुवार ११ जून रोजी जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) चे छत्रपती संभाजीनगर विभागीय समन्वयक डॉ. मुजीब सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. शहरी व ग्रामीण भागातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील १०० टक्के बालकांपर्यंत पोलिओ लसीकरण पोहोचविण्याचे उद्दिष्ट यावेळी निश्चित करण्यात आले. २८ जून रोजी जिल्ह्यात विविध पोलिओ बुथ उभारण्यात येणार असून आरोग्य पथकांकडून घरभेटीद्वारेही बालकांना पोलिओ डोस पाजण्यात येणार आहे. लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये, यासाठी सूक्ष्म नियोजन करून मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना कार्यशाळेत देण्यात आल्या.

कार्यशाळेस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजयकुमार पांचाळ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, आरएमओ डॉ. कल्याण कदम, आरसीएच अधिकारी डॉ. शिंदे, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. शिरसुलवार, डीईएमओ श्रीमती दिपके, जिल्हा आयुष अधिकारी, जिल्हा साथरोग अधिकारी तसेच सर्व तालुक्यांतील वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, जिल्हास्तरीय लसीकरण पर्यवेक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, डीएलएस, पीएचएन आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून प्रत्येक बालकापर्यंत पोलिओची लस पोहोचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

### ऑपरेशन 'यात्री सुरक्षा' अंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर तीन संशयित चोरटे जेरबंद

**परभणी,/प्रतिनिधी :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' मोहिमेंतर्गत रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), नांदेड विभागाने परभणी रेल्वे स्थानकावर कारवाई करत प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तीन संशयितांना ताब्यात घेतले. या तिघांविरुद्ध जीआरपी परभणी येथे गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

गुप्त माहितीच्या आधारे आरपीएफचे एएसआय अमोल वावळे यांनी ९ व १० जून रोजी परभणी रेल्वे स्थानकावर विशेष देखरेख ठेवली होती. या मोहिमेदरम्यान प्रवाशांच्या सामानावर डल्ला मारण्याच्या प्रयत्नात असलेल्या संशयितांना पकडण्यात आले. सीआयबी-डी अँड आय पथकाच्या सतर्कता, दक्षता आणि तातडीच्या कारवाईमुळे संभाव्य चोरीच्या घटना रोखण्यात यश आले. आरपीएफ नांदेडने रेल्वे प्रवाशांना प्रवासादरम्यान आपल्या सामानाची काळजी घेण्याचे, सतर्क राहण्याचे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तत्काळ रेल्वे सुरक्षा कर्मचाऱ्यांना अथवा रेल्वे हेल्पलाईन क्रमांक १३९ वर माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# "रस्ता-पूल नाही तर किमान पोहण्याचे तरी प्रशिक्षण द्या"

## चितनरवाडीतील ग्रामस्थांचे तहसीलदारांना उपरोधिक निवेदन

**जिंतूर ,/प्रतिनिधी:-** जिंतूर तालुक्यातील मौजे चितनरवाडी येथील रस्ता व ओढ्यावरील पूल बांधकामासाठी शासनाकडून दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी अद्याप खर्च न झाल्याने गावाच्या रस्ता आणि पूलासाठी उलगुलान आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपरोधिक पद्धतीने तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या चार वर्षांपासून उलगुलान आंदोलनाद्वारे गावाच्या रस्ता पुल बांधकामासाठी सर्व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने सातत्याने लढा देत आहेत. पावसाळ्यात गावालगतच्या ओढ्याला पूर येऊन परिसर जलमय होतो. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने नागरिक, विद्यार्थी, महिला, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. रस्ता व पूल बांधकामासाठी निधी उपलब्ध असूनही संबंधित यंत्रणेकडून कामे सुरू करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

मागील चार वर्षांपासून विविध शासकीय कार्यालयांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटलेला नसल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाला उपरोधिक इशारा दिला आहे. रस्ते व पूल उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांना मोफत पोहण्याचे प्रशिक्षण, लाईफ जॅकेट, दोरखंड व अन्य बचाव साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, त्यांची खरी मागणी पोहण्याचे प्रशिक्षण नसून मंजूर निधी तात्काळ खर्च करून रस्ता व पूल बांधकामाची कामे पूर्ण करावीत हीच आहे. अन्यथा पावसाळ्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेस संबंधित विभाग व प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदन विठ्ठल जाधव व समस्त ग्रामस्थ, चितनरवाडी यांच्या वतीने तहसीलदार, जिंतूर यांना सादर करण्यात आले. दोन आठवड्यात उत्तर न दिल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता परभणी यांच्या दालनात जवाब दो आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## परभणी ते पंढरपूर ३०० किमी सायकल वारीचे आयोजन; २० सायकलस्वारांचा सहभाग

**परभणी,/प्रतिनिधी-** प्रभावती डेली रायडर्स, परभणी यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त तिसऱ्या वर्षी परभणी ते पंढरपूर अशी ३०० किलोमीटर सायकल वारी १० ते १२ जुलै दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली, निसर्ग संवर्धन आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारी ही सायकल वारी यंदाही उत्साहात पार पडणार असून शहरातील २० सायकलस्वार यात सहभागी होणार आहेत.

वारीचे अध्यक्ष दीपक तळेकर, उपाध्यक्ष संदीप पवार, सचिव श्रीनिवास संगेवार, कोषाध्यक्ष राजेश्वर वासलवार यांच्यासह नीरज पारख, गिरीश जोशी, संकेत सराफ, शंकर फटके, सर्वज्ञ पवार, राहुल सिरसेवाड, बालाजी तावरे, कल्याण देशमुख, सूर्यकांत सोनटक्के, अजय शर्मा, सुरेश गंधम, माणिक गरुड, विजय दुधाने, ओमकार भेडसूरकर, गंगाधर यादव आणि बालासाहेब मंडलिक आदींचा सहभाग राहणार आहे.

वारीचा प्रारंभ १० जुलै रोजी पहाटे ४ वाजता परभणी येथून होणार आहे. पहिल्या दिवशी परळी-अंबाजोगाई मार्गे सुमारे १६० किलोमीटर सायकल प्रवास करून कळंब येथे मुक्काम करण्यात येणार आहे. त्यानंतर ११ जुलै रोजी पहाटे ४ वाजता कळंब येथून बार्शी मार्गे सुमारे १५० किलोमीटर अंतर पार करत वारकरी पंढरपूर येथे पोहोचणार आहेत.

आषाढी वारीचा आध्यात्मिक आनंद सायकलद्वारे अनुभवू इच्छिणाऱ्या माऊली भक्तांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी वारीचे अध्यक्ष दीपक तळेकर यांच्याशी ९८२३५८७९९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी; चालकाचा मृत्यू : वाघपिंपरी शिवारातील दुर्घटना

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू तालुक्यातील वाघपिंपरी शिवारात कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी झाल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १० जून रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

बालाजी विठ्ठलराव जाधव (वय २५, रा. वाघपिंपरी) हे ट्रॅक्टर घेऊन शिराळा येथे शेतीच्या कामासाठी जात होते. त्यावेळी वाघपिंपरी शिवारातील कॅनॉलजवळ ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने वाहन कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर आदळून पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टरच्या खाली दबून बालाजी जाधव यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी गोविंद विठ्ठलराव जाधव यांनी सेलू पोलिसांत फिर्याद दिली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## नांदेड विभागाची विशेष तिकीट तपासणी मोहीम; १,१५५ प्रकरणांतून ५.८६ लाखांचा महसूल

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांना सुरक्षित, सुलभ आणि नियमबद्ध प्रवासाचा अनुभव देण्यासोबतच विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात मंगळवारी (दि. ९) विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. विभागातील विविध रेल्वे स्थानके आणि गाड्यांमध्ये ही व्यापक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेचा मुख्य उद्देश रेल्वेच्या महसुलातील गळती रोखणे, प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि वैध तिकीटधारक प्रवाशांना अधिक सुरक्षित व आरामदायी प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. विशेष तपासणीदरम्यान तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी रेल्वे गाड्या, स्थानके तसेच महत्त्वाच्या प्रवासी क्षेत्रांमध्ये सखोल तपासणी केली. या कारवाईत विनातिकीट प्रवास करणाऱ्या ८०४ प्रवाशांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ४ लाख ४७ हजार १० रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला. तसेच अनियमित प्रवास करणाऱ्या २४५ प्रवाशांकडून १ लाख २२ हजार ५५० रुपये दंड वसूल करण्यात आला.

याशिवाय बुक न केलेल्या सामानाच्या १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आली. या प्रकरणांतून १६ हजार ८९५ रुपयांचा महसूल रेल्वेला प्राप्त झाला. या विशेष मोहिमेत एकूण १ हजार १५५ प्रकरणे आढळून आली असून रेल्वेला एकूण ५ लाख ८६ हजार ४५५ रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी विभागभर १५४ तिकीट तपासणी कर्मचारी तैनात करण्यात आले होते. यामध्ये तिकीट तपासणी पथकांमध्ये २९ कर्मचारी, स्थानकांवरील स्थिर तपासणीसाठी १२ कर्मचारी आणि सुविधा तसेच स्लीपर श्रेणी तपासणीसाठी ११३ कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या पथकांनी आरक्षित व अनारक्षित डबे, स्थानक परिसर तसेच सामान वाहतूक क्षेत्रांमध्ये तपासणी करून रेल्वे नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित केले.

नांदेड विभागाच्या वतीने विनातिकीट व अनियमित प्रवासाला प्रतिबंध घालणे, रेल्वे महसुलाचे संरक्षण करणे आणि प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे या उद्देशाने अशा मोहिमा नियमितपणे राबविल्या जात असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रवाशांनी प्रवासापूर्वी वैध तिकीट खरेदी करावे, अधिकृत श्रेणीतच प्रवास करावा आणि सामानाचे नियमानुसार बुकिंग करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदाच्या सर्वाधिक कालावधीचा ऐतिहासिक विक्रम,

# आदरणीय मोदीजी भारतीयांसाठी परमोच्च अभिमान बिंदू !

**परभणी ,/प्रतिनिधी:-** दिनांक २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला एक तप पूर्ण झाले.२६ मे २०१४ रोजी त्यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. तेव्हा अर्थातच देशातल्या सर्व जनतेला अतीव आनंद झाला. आपल्या स्वप्नांना हेच नेतृत्व समर्थ आकार देऊ शकते ही प्रत्येक जनतेच्या अंतःकरणातली भावना होती. पुढच्या कारकिर्दीत ती अतिशय सार्थ ठरली.२०१९ व २०२४ यावेळी त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारून हॅट्रिक साधली. त्यांच्या नेतृत्वाखाली सलग तीन वेळा जे सरकार देशात स्थापन झाले त्यानंतर देशवासीयांच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली. देशात यापूर्वी आदरणीय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय जनता पक्षाचे पहिले पंतप्रधान झाले. पहिल्यावेळी त्यांना केवळ तेरा दिवस तर दुसऱ्यांदा १३ महिने अशी संधी मिळाली. त्यानंतर एकवेळ पूर्ण कार्यकाळ मिळाला. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सलग तीन वेळा संधी मिळाल्याने प्रखर अशी राष्ट्रनिष्ठा, देशाबद्दलची कळकळ, निर्णय व धोरणे घेतानाचा ठामपणा, राष्ट्रहितासाठी आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला समूळ नष्ट करण्याची जिद्द, राष्ट्राच्या उद्धारासाठी त्यांचे प्रत्येक पाऊल देशवासियांना मोलाचे वाटले. आदरणीय मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल अत्यंत प्रगल्भपणे सुरू आहे याविषयी जनतेच्या मनात कोणतीही शंका नाही. किंबहुना या नेतृत्वामुळे आज भारताला पुन्हा प्रतिष्ठा मिळाली आहे. जगाच्या नकाशावर भारत एक समर्थ राष्ट्र म्हणून उदयाला आले आहे असेच प्रत्येक भारतीयाला वाटते. सलग तीन वेळा पंतप्रधानपदी विराजमान होऊन भारताला जगाच्या नकाशावर अभिमानाने वलय प्राप्त करून देणाऱ्या मोदीजींनी सर्वाधिक दिवस पंतप्रधानाचा आधीचा विक्रम मोडीत काढला आहे. हे त्यांचे कर्तृत्व संपूर्ण देशासाठी एक अभिमान बिंदू आहे.

देशात भारतीय जनता पक्षाची घोडदौड सुरू आहे. जनतेच्या मनात आज भाजपविषयी सर्व विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. त्यात आदरणीय मोदीजींचा सिंहाचा वाटा आहे. आज देशात २२ राज्यात एनडीएचे सरकार आहे. १७ मुख्यमंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. सबंध देशावर भारतीय जनता पक्षाचा जो प्रभाव आहे याला कारण मोदीजींचे करिष्मा असलेले नेतृत्व आहे. अर्थात हे केवळ भारतापुरते मर्यादित नाही तर या नेतृत्वाचा दबदबा जगभर आहे हे विरोधकांनाही मान्यच करावे लागेल. त्यासाठी अगदी अलीकडचीच दोन उदाहरणे द्यायची झाली तर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपले चांगले मित्र आहेत आणि भारत- अमेरिका यांच्यात व्यापार करार निश्चितपणे होईल असा ठाम विश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. त्याचवेळी अलीकडेच आलेल्या एका सर्वेक्षणानुसार भारताची अर्थव्यवस्था दिवसेंदिवस मजबूत होत असून चौथ्या तिमाहीत जीडीपी ७.८ टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. युद्धसदृश्य परिस्थितीमुळे जगातल्या अनेक अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत आहेत असे असताना भारताच्या अर्थव्यवस्थेने अपेक्षेपेक्षा अत्यंत चांगली कामगिरी केली आहे. कृषी क्षेत्रात लक्षणीय प्रगती, बांधकाम क्षेत्रातील वाढ, खाजगी गुंतवणूक या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून आपली अर्थव्यवस्था अत्यंत बळकट झाली आहे. अनेक देशांमध्ये अस्थिरता असताना भारताची मात्र वेगाने प्रगती सुरू आहे. मोदी है तो मुमकीन है ही केवळ आकर्षक घोषणा नाही तर देशवासीयांच्या मनातला प्रचंड असा विश्वास आहे.



आदरणीय मोदीजींची कारकीर्द प्रत्येक देशवासियाला आपली वाटते याची काही कारणे आहेत. अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदिर व्हावे यासाठी अनेकांनी आपले प्राण दिले. श्रीराम हा प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणातला परम आदरणीय असा उद्गार आहे. प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा प्रश्न अनेक वर्षे रेंगाळला. भव्य मंदिराचे लोकार्पण झाले, तो क्षण देशवासीय कधीच विसरू शकत नाही. त्या दिवशी प्रत्येक भारतीयाच्या मनात आनंदाच्या लाटा निर्माण झाल्या. सबंध देशाला एका सूत्रात गोवणारे दैवत म्हणून प्रभू श्रीरामाचे प्रत्येकाच्या अंतःकरणात स्थान आहे. मोदीजींनी जेव्हा मंदिराचे लोकार्पण करून ऐतिहासिक कर्तृत्व सिद्ध केले तेव्हा प्रत्येक भारतीय माणूस आनंदित झाला. अयोध्येतील राम मंदिराचे निर्माण ही प्रत्येक भारतीयाच्या मनातली पूर्ण झालेली आकांक्षा आहे. कश्मीरसाठी असलेले ३७० कलम रद्द करणे ही बाब सुद्धा संपूर्ण देशवासीयांना अभिमानास्पद वाटली आहे. असे निर्णय घेण्यासाठी प्रखर देशभक्ती असावी लागते. जे अडथळे येतील त्या सर्व अडथळ्यांना पुरून उरण्याची जिद्द असावी लागते. त्यासाठी कर्तव्यकठोर असणे गरजेचे आहे. मोदीजींच्या नेतृत्वात हे सर्व गुण आहेत. भारताची अस्मिता जोपासतानाच जगात भारताचा कणा ताठ ठेवण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे यावर देशातल्या सर्वच नागरिकांचा ठाम विश्वास आहे. मोदीजींनी या देशाची सूत्रे हाती घेतली तेव्हा भारत अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जगात अकराव्या क्रमांकावर होता तो आता चौथ्या क्रमांकावर आला आहे. यापुढेही भारताची विजयीगाथा सुरूच राहील.

जे विषय राष्ट्राच्या अस्मितेचे, अभिमानाचे आहेत त्याबाबत कोणतीही तडजोड करायची नाही असा ठाम निर्धार मोदीजींच्या नेतृत्वातून व्यक्त होतो. त्याचवेळी समाजातल्या गोरगरीब, उपेक्षित, वंचित घटकांची त्यांनी सतत काळजी घेतलेली आहे ही बाब देशवासीयांच्या समोर आहे. ८१ कोटी लोकांना दरमहा पाच किलो धान्य मोफत देण्याचा निर्णय असो अथवा २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचा निर्णय असो या सर्वच बाबी मोदीजींचे समाजातल्या गरीब घटकांविषयी किती जिव्हाळ्याचे धोरण आहे हे सिद्ध करणाऱ्या आहेत.

देशातल्या गोरगरीब महिलांसाठी इंधनाची समस्या जीवघेणी आहे. त्याचा थेट महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून आज देशातल्या कोट्यावधी महिला गॅसचा लाभ घेत आहेत. आजवरच्या कोणत्याही सरकारला हे सुचले नाही. ज्या घरात धुराचे लोट होते आणि केवळ घरच नव्हे तर महिलांचे आरोग्य काळवंडले होते अशा ठिकाणी त्यांना मुक्त श्वास आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी उज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या. प्रधानमंत्री आवास योजना, जनधन योजना या योजनेतून देशातल्या वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. ज्या जनतेच्या डोक्यावर हक्काचे छप्पर नाही अशा कोट्यावधी कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून हक्काचे घर मिळाले. समाजातल्या वंचित घटकांमध्ये आर्थिक परिवर्तन आणण्याच्या दृष्टिकोनातून हे सर्वच निर्णय अत्यंत महत्त्वाचे ठरले.

सामान्य कुटुंबापासून ते देशाच्या सर्वोच्च राजकीय पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा आधुनिक भारतातील लोकशाहीच्या सामर्थ्याचा एक प्रेरणादायी अध्याय आहे. त्यांचे नेतृत्व हे घराणेशाहीतून आलेले नाही तर प्रचंड अशा संघर्षातून सिद्ध झालेले आहे. २०१४ मध्ये भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी ''नवभारत'' घडविण्याचा संकल्प मांडला. व त्यांच्या नेतृत्वाखाली देशात अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात आल्या. जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत यांसारख्या उपक्रमांनी शासनाचा लाभ समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातही मोदी यांनी भारताची प्रतिमा उंचावली आहे. जगातील प्रमुख राष्ट्रांशी त्यांनी संबंध अधिक दृढ केले. विविध आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताची भूमिका प्रभावीपणे मांडली. जागतिक राजकारणात भारताचा वाढता प्रभाव आणि भारताविषयी निर्माण झालेला विश्वास हे त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वपूर्ण यश मानले जाते. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांच्या नेतृत्वाची मोठी परीक्षा झाली. या संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन, आरोग्य यंत्रणा आणि वैज्ञानिक समुदाय यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून मोठ्या लोकसंख्येपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात आल्या हे त्यांचे ऐतिहासिक कार्य आहे. जनसंपर्क कौशल्य, निर्णयक्षमता, कार्यनिष्ठा, विकासाची दृष्टी आणि राष्ट्रहिताची भूमिका यांमुळे ते आजवरच्या नेतृत्वात सर्वार्थाने सक्षम आणि प्रभावी ठरतात. हे निर्विवाद सत्य आहे.

शेतकरी हा या देशातला अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरमहा पेन्शन दिली जाते. अनेक कोरडवाहू,अल्पभूधारक आणि गरीब शेतकऱ्यांना हे हक्काचे पैसे दर महिन्याला त्यांच्या खात्यात जमा होतात. ग्रामीण भागात वयोवृद्धांची समस्या बिकट आहे. अशा परिस्थितीत हा पैसा लोकांच्या आरोग्याला कामी येतो. ज्येष्ठ नागरिकांना कोणासमोरही हात पसरण्याची पाळी येत नाही. परिणामी वृद्धांना अतिशय सन्मानाचे जीवन प्राप्त झाले. आजवरच्या कोणत्याही सरकारला हे सुचले नाही. मोदीजींची लोकप्रियता समाजातल्या सर्वच घटकात आहे याची ही अनेक कारणे आहेत. वयोवृद्ध नागरिक, महिला, युवक, समाजातले सर्व वंचित घटक, सामाजिक दृष्ट्या मागास असलेले वर्ग या सर्वांच्याच मनात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल प्रगाढ असा विश्वास आहे.

देशात सुरू असलेली आर्थिक प्रगती, लोककल्याणाचे असंख्य निर्णय, दहशतवादाला मिळालेली जबरदस्त चपराक अशा अनेक बाबी मोदींच्या नेतृत्वाला प्रकाशमान करणाऱ्या आहेत. एकेकाळी जम्मू काश्मीर ही या देशाची भळभळती जखम होती. या ठिकाणच्या दहशतवादाने एवढे रक्तरंजित वातावरण निर्माण केले होते की जनतेला भयाच्या सावटाखाली वावरावे लागत होते. निरपराध नागरिकांनी दहशतवाद्यांच्या कारवायांची किंमत मोजली. आदरणीय मोदीजींच्या दमदार आणि खंबीर नेतृत्वाने मात्र दहशतवादाचा पूर्णपणे बिमोड करण्याचे काम केले. दहशतवाद्यांचे अड्डे खणून काढल्याने कोणीही भारताकडे वाकड्या नजरेने पाहू शकत नाही असा ठाम विश्वास आज प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनात आहे. याच पद्धतीने नक्षलवादाच्या भस्मासुरालाही मोदीजींच्याच काळात धडा शिकवण्यात आला. दहशतवाद आणि नक्षलवाद या दोन्ही अपप्रवृत्तींना ठेचून काढण्याचे काम त्यांच्या कार्यकाळात झाले. देशातील सर्वोच्च नेते म्हणून प्रत्येकाच्या मनात त्यांचे अढळ असे स्थान आहे. गेल्या एक तपाच्या राजकारणात विरोधकांनी कितीही निरर्थक टीका केली आणि मोदीजींच्या प्रतिमेवर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला तरीही त्यांच्या प्रतिमेवर त्याचा तसूभरही परिणाम झाला नाही. त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे आणि आज ते देशाचे सर्वोच्च नेते आहेत याचे कारण जनतेच्या मनावर त्यांचा करिष्मा आहे, त्यांची पंतप्रधानपदाची तपपूर्ती हे भारतीय राजकारणातले एक सोनेरी पान आहे. त्याचबरोबर आजवरच्या सर्व पंतप्रधानांच्या कार्यकाळाचा विक्रम मोडणारी त्यांची कारकीर्द ही सबंध देशासाठी सर्वोच्च अभिमानबिंदू आहे.

**श्री.रामकिशन रौंदळे**
भाजपा
प्रदेश कार्यकारणी सदस्य

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# व्याप्त काश्मीर पुन्हा पेटले!

उभे जग ज्याला व्याप्त काश्मीर म्हणून ओळखते, तो भारताचा भूभाग म्हणजे केवळ भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील जमिनीचा वाद नव्हे. भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचा सुंदर आविष्कार असलेल्या जनजीवनाची आणि देशाच्या संपन्न संस्कृतीची झालेली ती वेदनादायी फाळणी आहे. त्या फाळणीचे ओरखडे मनावर वागवत, सहन करत आपले हरवलेले हक्क पुन्हा मिळविण्यासाठी स्वातंत्र्याची चातकासारखी वाट पाहणाऱ्या लाखो नागरिकांची ती वेदना आहे. व्याप्त काश्मीरच्या भूगोलाचा इतिहास आणि वर्तमान काहीही असले, तरी या प्रांताचे भविष्य मात्र आता निर्णायक वळणावर उभे आहे. पाकिस्तानची खालावलेली आर्थिक स्थिती आणि व्याप्त काश्मीरमधील स्थानिक जनतेत धुमसणारा तीव्र असंतोष पाहता, हा प्रदेश फार काळ पाकिस्तानच्या जुलमी राजवटीखाली राहू शकणार नाही, अशी चिन्हे दिसत आहेत. भारताची आर्थिक आणि जागतिक ताकद पाहता, भविष्यात हा भूभाग पुन्हा एकदा अखंड भारताचा भाग बनेल आणि भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा मानबिंदू असलेल्या शारदा पीठाचा हरवलेला गौरव परत येईल, हीच प्रत्येक भारतीयाची आणि तेथील त्रस्त जनतेची अपेक्षा आहे.

भौगोलिकदृष्ट्या उंचावर असलेला, मुळात भारताच्या नकाशाचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश राजकीय आणि भावनिकदृष्ट्याही संवेदनशील आहे. म्हणूनच स्वातंत्र्यापासून आजपर्यंत तो सातत्याने भारत आणि पाकिस्तानमधील वादाचे मुख्य केंद्र राहिला आहे. हा वाद केवळ लष्करी कारवाया आणि सीमेच्या रक्षणापुरता मर्यादित नाही. कारण व्याप्त काश्मीर म्हणजे केवळ राजकीय नकाशाचा तुकडा नाही. या प्रदेशाची माती, त्या मातीतील माणसे, त्यांचा इतिहास, परंपरा यांची एक वेगळी ओळख आहे. इतिहासकाळात भारतीय उपखंडातील ज्ञान आणि संस्कृतीचे मोठे केंद्र असलेले नीलम व्हॅलीमधील शारदा पीठ आज भग्नावस्थेत आणि लष्करी छावणीच्या विळख्यात अडकले आहे. हिंदू-बौद्ध संस्कृतीचा हा विलोभनीय वारसा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. जेथे भाषांचे अस्तित्व संकटात येते, तेथील संस्कृती धोक्यात येते, हा इतिहास आहे. व्याप्त काश्मीरमधील स्थानिक भाषांचे भवितव्य संपविण्याच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे तेथील संस्कृतीदेखील अशीच संकटात सापडल्याची जनतेची भावना आहे. मुख्यत: शियाबहुल भूभाग असलेल्या या प्रदेशात जाणीवपूर्वक सुन्नी समाजाचे पुनर्वसन केल्याने स्थानिक जनजीवनाचे संतुलन बिघडले आहे. येत्या २७ जुलै रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर आंदोलन करणाऱ्या नागरिकांना पाकिस्तानी सुरक्षा दलांनी गोळीबार केला. संतप्त जनतेने रस्त्यावर उतरून प्रचंड आंदोलन उभे केले आणि ते चिरडण्यासाठी पाकिस्तानी सैन्याकडून अंदाधुंद हत्याकांड सुरू झाले. गेल्या काही दिवसांत शेकडो नागरिकांना पाकिस्तानी सैनिकांनी गोळ्या घालून ठार केल्याच्या बातम्या असल्याने, भारताशी सांस्कृतिक आणि भौगोलिक नाते असलेल्या या प्रदेशातील नागरिकांच्या चिंतेने उभा देश अस्वस्थ झाला आहे. पाकिस्तानला या हत्याकांडाबद्दल जाब विचारला जावा, यासाठी भारताने दबाव आणण्याच्या सुरुवात केल्याने, तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि मानवी हक्कांचा मुद्दा जागतिक स्तरावर पोहोचला आहे. पाकिस्तानच्या विळख्यातून हा प्रदेश मुक्त करण्याच्या आणि भारतासोबतचे दुरावलेले नाते पुन्हा जोडण्याच्या जुन्या प्रयत्नांना आता वेग आला आहे. हा वाद जितका जुना तितकाच गुंतागुंतीचादेखील आहे. व्याप्त काश्मीरचे भविष्य केवळ भारत आणि पाकिस्तानपुरते मर्यादित राहिलेले नाही, त्यात चीनचाही प्रवेश झाला आहे. चीन आणि पाकिस्तानमधील आर्थिक कॉरिडॉर उभारणीच्या प्रकल्पांतर्गत, भारताचा भूभाग असलेल्या या प्रदेशात अब्जावधी डॉलर्स खर्च करून रस्ते आणि रेल्वे नेटवर्क उभारणीच्या चीनच्या बेकायदा कारवायांना भारताने सातत्याने विरोध सुरू ठेवला आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर भारताने व्याप्त काश्मीरबाबत अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक भूमिका घेतली. भारताचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश परत मिळवणे हेच भारताचे ध्येय आहे, ही भूमिका भारताकडून सातत्याने व ठामपणे मांडली जात आहे. पाकिस्तानकडून भविष्याची कोणतीही हमी नसल्याच्या भावनेने ग्रासलेल्या स्थानिक जनतेच्या असंतोषाला भारताच्या या भूमिकेमुळे मोठे बळ मिळत असल्याने व्याप्त काश्मीर आणि गिलगीट, बाल्टिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधात अभूतपूर्व निदर्शने होत आहेत. महागाई, अन्नधान्याचा तुटवडा आणि विजेच्या वाढत्या किमतींमुळे त्रस्त झालेले लोक भारतात सामील होण्याची भावना तर उघडपणे बोलून दाखवू लागले आहेत. व्याप्त काश्मीरमधील सर्वांत मोठी नागरी संघटना असलेल्या संयुक्त अवामी कृती समितीवर पाकिस्तान सरकारने दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत बंदी घातल्याने या प्रदेशातील हिंसाचार उफाळला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. या हिंसाचाराची दखल जगाने घेतली आहेच. पाकिस्तानमधील मानवाधिकार आयोगानेही त्याबद्दल चिंता व्यक्त केल्याने, आंदोलनास नैतिक बळ मिळाले आहे. भारताच्या भूमिकेस पोषक अशा घडामोडींचे एक नवे पर्व सुरू होत आहे. त्याला हिंसाचारी दुर्दैवी किनार आहे. पण जेव्हा जनता आपल्या मागण्यांसाठी ठामपणे उभी राहते, तेव्हा अशा आंदोलनांची ताकद वाढत असते.

फाळणीनंतर देशातील साडेपाचशेहून अधिक संस्थानांप्रमाणेच, जम्मू-काश्मीरचे तत्कालीन शासक महाराजा हरि सिंह यांनीही जम्मू-काश्मीर भारतात विलीन केले होते. मात्र, १९४७-४८ मध्ये पाकिस्तानने दहशतवादी आणि सैन्य घेत जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरी केली. त्यातून भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीने झालेल्या युद्धविरामानंतर जम्मू-काश्मीरचा हा सुमारे ३५ टक्के भूभाग बेकायदा पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. फेब्रुवारी १९९४ मध्ये भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मंजूर केला आणि पाकिस्तानने बळकावलेला हा भूभाग भारताच्या स्वाधीन करावा या मागणीचा हुंकार देशभर उमटला. नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असलेल्या या प्रदेशातून पाकिस्तानला मोठा सामरिक आणि आर्थिक फायदा मिळतो. सिंधू नदीच्या आधाराने वसलेल्या या प्रदेशात जलविद्युत निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. तसेच जंगलसंपत्ती आणि ग्रॅफाईट, बॅंटोनाईट, लिमोनाईट, संगमरवर आणि मौल्यवान रत्ने यांसारखी खनिज संपत्तीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. पाकिस्तानातील पंजाब आणि सिंध प्रांतांतील शेतीसाठी लागणाऱ्या सिंचनाच्या पाण्यापैकी मोठा हिस्सा या प्रदेशातूनच मिळतो. पण या प्रदेशातील साधनसंपत्तीचा मुख्य भूभागासाठी वापर करणाऱ्या पाकिस्तानकडून स्थानिक जनतेस मात्र कोणतेच आर्थिक लाभ दिले जात नाहीत. कुपोषण, अन्नसमस्या, माता- बालमृत्यूंचे थैमान, सुविधांचा अभाव यामुळे भविष्यविषयीच्या आशा खुंटलेल्या या प्रदेशास भारताच्या ठाम भूमिकेमुळे मोठा दिलासा मिळत राहिला ही त्यातील समाधानाची बाब ठरते. 'आझाद काश्मीर' असे नाव असलेल्या या प्रदेशात पाकिस्तानला स्वातंत्र्याची प्रतिमा दिसत असली तरी प्रत्यक्षात मात्र, राजकीयदृष्ट्या मर्यादित स्वायत्तता, आर्थिक शोषण आणि सामाजिक-आर्थिक मागासलेपण अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या या प्रदेशाला मुक्तीची भूक लागली आहे. ताजे आंदोलन आणि त्यावरील दडपशाहीमुळे मुक्तीचा मार्ग निर्णायक वळणावर येण्याची चिन्हे असून, तसे झाले, तर भारताच्या भूमिकेचा मोठा विजय दृष्टिपथात येत असल्याचे समाधानही आता अनुभवता येणार आहे. दीर्घकाळापासूनचा हा संवेदनशील जाणिवांचा गुंता आता भारताने अधिक काळ सहन करू नये, हीच व्याप्त काश्मिरी जनतेची आणि तमाम भारतीयांची अपेक्षा आहे. कारण या गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळे तेथील जनतेची घुसमट सुरू आहे. तेथे पाकिस्तानने स्वातंत्र्याचा मुखवटा चढवला असला, तरी जनता पारतंत्र्याच्या जाणिवांनी खंतावलेली आहे. दीर्घकाळापासून हरवलेली ओळख पुन्हा मिळविण्यासाठी आणि तुटलेले सांस्कृतिक नाते पुन्हा जोडण्यासाठी तेथील जनता उत्सुक आहे.

## अर्थविशेष

# पुनर्विकासात घाई नको, माहिती हवी!

**हितेश पारसे**

आज महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक शहरात पुनर्विकास हा चर्चेचा विषय बनला आहे. अनेक शहरांमध्ये ३० ते ५० वर्षांपूर्वी बांधलेल्या गृहनिर्माण संस्था आता वयोमानामुळे विविध समस्यांना सामोऱ्या जात आहेत. अनेक सोसायट्यांसमोर पुनर्विकासाचा पर्याय उभा राहिला आहे. अशा वेळी पुनर्विकास हा शब्द ऐकताच प्रत्येक फ्लॅटधारकाच्या मनात एक नवीन, प्रशस्त आणि आधुनिक घराचे स्वप्न उभे राहते. पुनर्विकास हा केवळ नवीन फ्लॅट मिळविण्याचा विषय नसून तो प्रत्येक कुटुंबाच्या आयुष्यभराच्या कमाईशी, मालमत्तेच्या हक्काशी आणि आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा निर्णय असतो. चुकीचा विकासक, कमकुवत करार किंवा अपुरी पडताळणी यामुळे अनेक सदस्यांना वर्षानुवर्षे भाड्याच्या घरात राहण्याची वेळ येते. काही प्रकल्प न्यायालयात अडकतात; काही आर्थिक कारणांमुळे रखडतात.

अनेक वेळा विकासकांकडून अत्यंत आकर्षक सादरीकरण केले जाते. सुंदर डिझाईन, आलिशान लॉबी, आधुनिक सुविधा आणि वाढीव क्षेत्रफळ यांची माहिती दिली जाते. परंतु पुनर्विकासाचा निर्णय हा कधीही भावनिक नसावा. विकासकाची आर्थिक क्षमता, त्याने पूर्ण केलेले प्रकल्प, त्याच्या विरोधातील न्यायालयीन वाद, बाजारातील प्रतिष्ठा, ग्राहकांचा अनुभव आणि रेरा वरील नोंदी तपासल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये.

**इमारत खरोखर पुनर्विकासासाठी पात्र आहे का?** : अनेक वेळा काही सदस्य पुनर्विकासासाठी उत्सुक असतात तर काही सदस्य त्यास विरोध करतात. अशा वेळी भावना बाजूला ठेवून तांत्रिक वास्तव समजून घेणे आवश्यक असते. यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट हा सर्वांत महत्त्वाचा दस्तावेज आहे. अधिकृत संरचनात्मक अभियंता इमारतीची तपासणी करून तिची वास्तविक स्थिती सांगतो. काही वेळा इमारत इतकी धोकादायक स्थितीत असते की पुनर्विकासाशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. तर काही वेळा आवश्यक दुरुस्ती करून इमारतीचे आयुष्य वाढवता येते.

**पीएमसी म्हणजे सोसायटीचा संरक्षक** : पुनर्विकास प्रक्रियेत विकासकाकडे तज्ज्ञांची संपूर्ण टीम असते. त्यांच्याकडे आर्किटेक्ट, अभियंते, कायदेशीर सल्लागार आणि आर्थिक तज्ज्ञ असतात. परंतु सामान्य सदस्यांकडे अशी तांत्रिक माहिती नसते. याच कारणामुळे आज अनेक सोसायट्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नेमत आहेत. पीएमसी हा विकासकाचा नसून सोसायटीचा प्रतिनिधी असतो. तो व्यवहार्यता अहवाल तयार करतो, निविदा प्रक्रिया राबवतो, विकासकांची तुलना करतो, करार तपासतो आणि संपूर्ण प्रकल्पावर देखरेख ठेवतो. पीएमसीवर खर्च होणारी रक्कम ही खर्च नसून भविष्यातील संभाव्य नुकसानीपासून बचाव करणारी गुंतवणूक असते.

पुनर्विकासातील सर्वांत महत्त्वाचा दस्तावेज म्हणजे विकास करार. दुर्दैवाने अनेक सदस्य हा करार पूर्णपणे न वाचता स्वाक्षरी करतात. नंतर वाद निर्माण झाल्यावर त्यांना करारातील त्रुटी लक्षात येतात. विकास करारामध्ये खालील बाबी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे : नवीन फ्लॅटचा कार्पेट एरिया, पार्किंग हक्क, कॉर्पस फंड, मासिक भाडे, बांधकाम कालावधी, विलंब झाल्यास दंड, विमा संरक्षण आणि नवीन फ्लॅटचा ताबा देण्याची प्रक्रिया या बाबतच्या सर्व अटी व शर्ती करारामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, बैठकीत दिलेले आश्वासन आणि करारात लिहिलेले आश्वासन यामध्ये मोठा फरक असतो. कायद्याच्या दृष्टीने करारात नमूद केलेल्या बाबींनाच महत्त्व असते.

**मोठा फ्लॅट म्हणजे नेमका किती मोठा?** : पुनर्विकासातील सर्वांत मोठा गैरसमज म्हणजे वाढीव क्षेत्रफळ. अनेक वेळा विकासक ३० टक्के, ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक वाढीव क्षेत्रफळ देण्याचे आश्वासन देतात. परंतु सदस्यांनी हे समजून घेतले पाहिजे की प्रत्यक्ष वापरता येणारे क्षेत्र म्हणजे कार्पेट एरिया. म्हणून नवीन फ्लॅटचा कार्पेट एरिया, बाल्कनी, टेरेस, पार्किंग आणि इतर सुविधा लेखी स्वरूपात निश्चित असणे आवश्यक आहे. पुनर्विकासाचा सर्वांत कठीण भाग म्हणजे काही वर्षांसाठी स्वतःचे घर सोडून भाड्याच्या घरात राहणे. अनेक वेळा सदस्य केवळ मासिक भाड्याकडे लक्ष देतात. परंतु खालील बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत- डिपॉझिट, स्थलांतर खर्च, परतीचा खर्च, भाड्यातील वार्षिक वाढ, विलंब झाल्यास अतिरिक्त भाडे. आज मिळणारे भाडे पुढील तीन-चार वर्षांनी त्याच परिसरात घर घेण्यासाठी पुरेसे असेलच असे नाही. त्यामुळे भविष्यातील महागाई विचारात घेऊन करार केला पाहिजे.

**विरोध करणाऱ्या सदस्यांचे काय?** : जवळपास प्रत्येक पुनर्विकास प्रकल्पात काही सदस्य विरोध करतात. महत्त्वाची बाब म्हणजे विरोध करणारा सदस्य नेहमी चुकीचा असतो असे नाही. म्हणून अशा सदस्यांना विरोधक समजण्याऐवजी त्यांच्या शंकांचे निरसन करणे आवश्यक असते. तथापि, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक बहुमताने निर्णय झाल्यानंतर केवळ अडथळा निर्माण करण्यासाठी विरोध करणाऱ्या सदस्यांविरुद्ध कायदेशीर उपाययोजना उपलब्ध असतात.

**रेराचे महत्त्व** : आज पुनर्विकासामध्ये रेराची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. प्रकल्पाची नोंदणी, मंजूर नकाशे, बांधकामाची प्रगती, पूर्णत्व कालावधी आणि विकासकाची माहिती रेरा पोर्टलवर उपलब्ध असते. म्हणून प्रत्येक सदस्याने प्रकल्प आणि विकासकाची रेरावर पडताळणी करणे आवश्यक आहे.

**पुनर्विकासातील सर्वांत मोठी चूक** : अनेक सोसायट्या सर्वाधिक लाभ देणाऱ्या विकासकाची निवड करतात. जास्त क्षेत्रफळ, जास्त कॉर्पस फंड किंवा जास्त भाडे यामुळे सदस्य प्रभावित होतात. परंतु सर्वाधिक लाभ देणारा प्रस्ताव हा नेहमीच सर्वोत्तम प्रस्ताव असतो असे नाही. विश्वासार्हता, आर्थिक क्षमता, प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता, बँकिंग सपोर्ट, अनुभव आणि कायदेशीर संरक्षण या बाबींना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

**निष्कर्ष** : पुनर्विकास हा आयुष्यात कदाचित एकदाच येणारा निर्णय असतो. हा निर्णय घेताना घाई, अफवा, दबाव किंवा भावनिकता यावर आधारित मत बनविणे धोकादायक ठरू शकते. प्रत्येक फ्लॅटधारकाने स्वतः माहिती घ्यावी, तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, सर्व कागदपत्रे तपासावीत आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. लक्षात ठेवा, पुनर्विकासाचा उद्देश केवळ नवीन इमारत उभारणे नसून सुरक्षित, आधुनिक आणि अधिक मूल्यवान मालमत्ता निर्माण करणे हा आहे. योग्य विकासक, सक्षम पीएमसी, मजबूत कायदेशीर संरक्षण आणि जागरूक सदस्य यांच्या साहाय्याने पुनर्विकास ही खरोखरच सुवर्णसंधी ठरू शकते. परंतु अपुरी माहिती, चुकीची निवड आणि निष्काळजीपणा यामुळे हीच संधी भविष्यातील डोकेदुखी बनू शकते. म्हणून पुनर्विकासाच्या कोणत्याही प्रस्तावावर स्वाक्षरी करण्यापूर्वी स्वतःला एक प्रश्न अवश्य विचारा- ''मी हा निर्णय संपूर्ण माहिती आणि योग्य पडताळणीच्या आधारे घेत आहे का?'' कारण पुनर्विकासातील सर्वांत मोठी सुरक्षा कोणती असेल, तर ती म्हणजे जागरूक, माहितीपूर्ण आणि सक्रिय फ्लॅटधारक.

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न**

१. पुनर्विकास म्हणजे नेमके काय? जुनी इमारत पाडून त्याच जागेवर नवीन इमारत बांधण्याची प्रक्रिया.

२. पुनर्विकासासाठी सर्व सदस्यांची संमती आवश्यक असते का? नेहमीच नाही. लागू कायदे व शासन निर्णयांनुसार आवश्यक बहुमत महत्त्वाचे असते.

३. स्ट्रक्चरल ऑडिट का आवश्यक आहे? इमारतीची वास्तविक स्थिती आणि पुनर्विकासाची गरज निश्चित करण्यासाठी.

४. पीएमसी म्हणजे कोण? सोसायटीच्या हिताचे संरक्षण करणारा स्वतंत्र प्रकल्प सल्लागार.

५. विकास करार का महत्त्वाचा आहे? तो संपूर्ण पुनर्विकास प्रक्रियेचा मुख्य कायदेशीर दस्तावेज असतो.

६. पी.ए.ए.ए. म्हणजे काय? कायमस्वरूपी पर्यायी निवास व्यवस्था करार - नवीन फ्लॅटच्या हक्काचा करार.

७. कार्पेट एरिया म्हणजे काय? फ्लॅटमधील प्रत्यक्ष वापरता येणारे क्षेत्र.

८. भाड्यात वार्षिक वाढ मिळू शकते का? होय. करारात योग्य तरतूद असल्यास.

९. पुनर्विकासाचा निर्णय घेताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती? संपूर्ण माहिती, योग्य पडताळणी आणि तज्ज्ञांचा सल्ला.

१०. कॉर्पस फंड म्हणजे काय? पुनर्विकासाच्या बदल्यात सदस्यांना किंवा सोसायटीला मिळणारी आर्थिक रक्कम.

११. रेराचे महत्त्व काय? पारदर्शकता आणि सदस्यांचे संरक्षण.

१२. विकासकाची पडताळणी कशी करावी? रेरा, पूर्वीचे प्रकल्प, ग्राहकांचा अनुभव आणि आर्थिक क्षमता तपासून.

१३. विरोध करणारा सदस्य प्रकल्प थांबवू शकतो का? प्रत्येक प्रकरण वेगळे असते; परंतु वैध प्रक्रिया पूर्ण झाल्यास केवळ विरोध पुरेसा ठरत नाही.

१४. नवीन फ्लॅट मिळाल्यानंतर कोणती कागदपत्रे घ्यावीत? भोगवटा प्रमाणपत्र, ताबा पत्र, भाग प्रमाणपत्र, मंजूर नकाशे, इत्यादी.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# 'क्यू डे'साठी तयार आहात का?

डिजिटल क्रांती झपाट्याने स्वीकारून आपण भारतीय वेगाने पुढे जात आहोत. हा हा म्हणता सगळ्या आर्थिक स्तरावरील मंडळींसाठी स्मार्टफोन ही जीवनावश्यक वस्तू बनली. त्यासोबत वापरायचे तऱ्हेतऱ्हेचे गॅजेट्स, ॲप्स, डाऊनलोडिंग, शेअरिंग, अपडेट्स असे अनेक परवलीचे शब्द तयार झाले आणि जनसामान्यांच्या तोंडात स्थानापन्न झाले. सोबतच ई-बँकिंग, ऑनलाईन शॉपिंग, ई-कॉमर्स अशा सगळ्या नवनवीन गोष्टी 'सोय' म्हणून वापरू लागलो आणि त्याची सवय अंगवळणी पडली. दुसरीकडे, सोशल मीडियावर मनोरंजन म्हणून, रील बनवून कमाई करणाऱ्यांची फौज उभी झाली आहे. शिवाय, स्मार्टफोनला मागे टाकून विअरेबल म्हणजे अंगावर घालण्याजोगे डिव्हाईसेस जेन झीची पसंत बनते आहे. सगळं खूप फटाफट घडतंय आणि त्यावर सध्या तरी आक्षेप घेण्यासारखं काही वाटत नाही. पण, या वेगाच्या दुसऱ्या बाजूचा 'वेध' घेऊ या.

भारतीयांची अशी सगळी कामे झटपट होत असताना, त्या सर्व्हरवर कुठेतरी, कदाचित भारताच्या सीमांपलीकडे, एखाद्या देशाने तयार केलेली गुप्तयंत्रणा शांतपणे ही सगळी माहिती अर्काईव्ह करत असेल तर... आज हे सगळे पासवर्ड्स, ओटीपी, फोटो-व्हिडीओज्, खाजगी संभाषण, सीसीटीव्ही फूटेज वगैरे 'एन्ड टू एन्ड एन्क्रिप्टेड' दिसत असले तरी ते जगाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात ते जसेच्या तसेच जपून ठेवले जात आहेत. यासाठी जगभरातील देश काम करत असले तरी चीन त्यात अग्रेसर आहे. आपली इस्रोदेखील क्वांटम जगभरात ५१८ कंपनीज् यासाठी काम करत असून त्यापैकी ४१४ कंपनीज् चीनच्या आहेत. त्यातही, या कामासाठी 'सॉल्ट टायफून' ही चीन सरकारची अधिकृत एजन्सी मानली जाते. ऑक्टोबर २०२४ मध्ये 'सॉल्ट टायफून'चे काम जगापुढे आले होते.

माहितीचा हा प्रचंड साठा कशासाठी एकत्र केला जातोय? या प्रश्नाचे उत्तर 'क्यू डे'च्या संकल्पनेत आहे. क्वांटम कंप्युटर्स म्हणजे अफाट क्षमतेचे भावी अत्याधुनिक हार्डवेअर जे नजीकच्या भविष्यात या संपूर्ण माहितीवर प्रक्रिया करून, ती खुली करू शकतील. आजच्या कॉम्प्युटर्सचे काम बिट्सवर चालते तसे, क्वांटम कॉम्प्युटर्स क्विबिट्सवर काम करतील. उदाहरणार्थ, आजपर्यंत उपलब्ध असलेला डेटा एन्क्रिप्ट करण्यासाठी सध्याच्या वेगवान कॉम्प्युटर्सना १०० वर्षांवर कालावधी लागू शकतो. हेच काम क्वांटम कॉम्प्युटर ८ ते १० वर्षांमध्ये पूर्ण करू शकेल. हे ज्या दिवशी होईल तो दिवस असेल क्यू डे! रेल्वे-विमान यंत्रणांपासून बँकांपर्यंत, शेअर बाजारापासून आधार कार्डच्या बायोमेट्रिक डेटापर्यंत, टपाल खात्यांपासून माध्यमांपर्यंत इंटरनेटशी संबंधित व्यवस्था कोलमडेल. संरक्षण खात्याची माहिती, अण्वस्त्रांचे पासवर्डस्ही डिकोड होतील. जगाच्या कानाकोपऱ्यातील सीसीटीव्ही प्रत्येकाची दैनंदिनी चव्हाट्यावर आणतील.

यालाच म्हणतात एचएनडीएल म्हणजे हार्वेस्ट नाऊ, डिक्रीप्ट लेटर! म्हणजेच, आज मिळेल तेवढी माहिती संग्रहित करून ठेवा आणि क्वांटम कॉम्प्युटर्स कार्यान्वित होताच, माहिती डिक्रिप्ट करा. ग्लोबल रिस्क इन्स्टिट्यूटच्या ३२ क्वांटम संशोधकांच्या मते, २०३३ ते २०३७ दरम्यान, या सगळ्या प्रक्रिया पूर्ण होऊन, कोणत्याही देशावर असा क्यू डे हल्ला होऊ शकेल. रक्ताचा एक थेंबही न सांडता, एखाद्या राष्ट्राला नेस्तनाबूत करता येईल. या सगळ्यात प्रशासकीय यंत्रणेतील मोठा डेटा हल्लेखोरांच्या हाती लागू शकतो. याचे प्रात्यक्षिक रशिया-युक्रेन आणि इस्रायल-इराण युद्धाच्या वेळी आपण बघितले आहेत. प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वी युक्रेन आणि इराणवर सायबर हल्लेच करण्यात आले होते.

हा धोका ओळखून भारत सरकारने विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला, राष्ट्रीय क्वांटम मिशन या आगामी ८ वर्षांसाठीचा दूरदर्शी उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी ६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. आगामी क्वांटम युगाची पावले नेमकी ओळखून घेतलेल्या या निर्णयामुळे क्वांटम सुरक्षा ही शक्यता नाही तर धोरणात्मक गरज आहे आणि गेल्या ३० वर्षांत सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातील हा एकमेव सर्वांत मोठा बदल आहे. भविष्यातील हल्ल्यांपासून सुरक्षा महत्त्वाची असली तरी आजच आपला डेटा सुरक्षित ठेवणे जास्त महत्त्वाचे आहे. भारत सरकारच्या प्रयत्नांमध्ये नागरिकांचा खारीचा वाटा असायलाच हवा. डिजिटल देवाणघेवाण करण्यासाठी स्वतंत्र बँक खात्याचा वापर करायला हवा. आर्थिक व्यवहार शक्यतो प्रत्यक्षात करावे. खाजगी फोटो-संभाषण, महत्त्वाचे दस्तावेज सोशल मीडियावर शेअर करताना टायमर लावण्यासारखी काळजी घ्यावी. देशभरातील आयआयटीज्मध्ये क्वांटम सिक्युरिटी या विषयावर लहानमोठे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते करून या क्षेत्रात करीयर घडविण्याच्याही संधी आहेत. संकटाचे रूपांतर संधीत कसे करायचे? हे आपण भारतीय जाणतोच.'क्यू डे'साठी तयारी करण्याची हीच ती वेळ आहे.

९२२३७००२७७

## विशेष

# 'स्मार्ट ग्रिड' तंत्रज्ञानावर भर

**प्रा. सुखदेव बखळे**

आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या (आयईए) अंदाजानुसार, ग्रिडचे डिजिटलायझेशन २०३० पर्यंत खंडित स्वरूपाच्या नवीकरणीय ऊर्जा प्रणालींमधील वीज कपात २५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात कमी करू शकते. यामुळे संपूर्ण प्रणालीची कार्यक्षमता वाढेल आणि ग्राहकांसाठी खर्चातही घट होईल. यावरून स्पष्ट होते की, भविष्यातील ऊर्जा व्यवस्था केवळ उत्पादन क्षमतेवर नव्हे, तर स्मार्ट व्यवस्थापनावरही अवलंबून असणार आहे. नीती आयोगाच्या 'विकसत भारत अँड नेट झीरो' या ताज्या अहवालातही याच मुद्यावर भर देण्यात आला आहे. अहवालानुसार, नवीन 'ट्रान्समिशन कॉरिडॉर' आणि सबस्टेशन्स उभारण्याबरोबरच 'स्मार्ट ग्रिड' तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करणे अत्यावश्यक आहे. कारण देशातील अनेक भागांमध्ये विद्यमान वीज ग्रिड जुनी आणि अपुरी आहे. नवीकरणीय ऊर्जेतील चढउतार आणि विकेंद्रित उत्पादन केंद्रांची वाढती संख्या हाताळण्यासाठी ती सक्षम नाही. त्यामुळे भविष्यातील ऊर्जा सुरक्षेसाठी वीज ग्रिडचे आधुनिकीकरण ही केवळ पर्यायाची बाब राहिलेली नाही, तर राष्ट्रीय गरज बनली आहे. 'स्मार्ट ग्रिड'ची संकल्पना मूलतः वीज वितरणाच्या पारंपरिक पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणते. वितरण स्तरावर स्मार्ट मीटर आणि प्रगत ग्रीड प्रणाली हे या परिवर्तनाचे प्रमुख आधारस्तंभ ठरत आहेत. स्मार्ट मीटर ग्राहकांच्या वीज वापराची सूक्ष्म आणि रिअल टाईम माहिती उपलब्ध करून देतात. त्यामुळे बिलिंगची अचूकता वाढते, वीज चोरी आणि तांत्रिक नुकसान कमी होते तसेच मागणीचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. विजेचे स्मार्ट मीटर व्यापक 'डिजिटल ग्रिड प्लॅटफॉर्म'शी जोडले जातात, तेव्हा डिमांड रिस्पॉन्स, वेळेनुसार वीज दर निश्चित करणे आणि 'लोड फोरकास्टिंग' यांसारख्या अत्याधुनिक सुविधा शक्य होतात.

या प्रकल्पासाठी केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने विविध भागधारकांचा समावेश असलेली 'टास्क फोर्स' स्थापन केली आहे. ही 'टास्क फोर्स' 'आयईएस'चा रोडमॅप, आर्किटेक्चर आणि डिझाईन निश्चित करत आहे. दिल्ली, गुजरात, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि मुंबईतील वितरण कंपन्यांमध्ये प्रायोगिक अंमलबजावणीचे नियोजन करण्यात आले असून २०२६-२७ पर्यंत त्याचे प्रात्यक्षिक सादर करण्याचे उद्दिष्ट आहे. सरकारने या प्रकल्पासाठी ५१३ दशलक्ष रुपयांची तरतूद केली असून आतापर्यंत त्यापैकी ३८.८ दशलक्ष रुपये वितरित करण्यात आले आहेत. 'स्मार्ट मीटरिंग'च्या क्षेत्रातही 'रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम' (आरडीएसएस) महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तब्बल तीन लाख कोटी रुपयांच्या या योजनेंतर्गत देशभरात २५० दशलक्ष स्मार्ट ग्राहक मीटर बसवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १८ मार्च २०२६ पर्यंत देशभरात जवळपास ६० दशलक्ष स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, २०२५-२६ या वर्षातच ३४ दशलक्षांहून अधिक स्मार्ट मीटर बसवण्यात आले. मागील वर्षाच्या तुलनेत ती जवळपास दुप्पट आहेत. या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांना बिलिंग आणि वसुली कार्यक्षमतेत सुधारणा तसेच वितरणातील नुकसान कमी होण्याचे ठोस परिणाम दिसू लागले आहेत. याशिवाय, २०१५ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'नॅशनल स्मार्ट ग्रिड मिशन'ने देशातील स्मार्ट ग्रिड उपक्रमांना गती देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या मोहिमेमुळे 'अॅडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर' (एएमआय) इकोसिस्टिमच्या विकासाला चालना मिळाली असून विविध स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञानांची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे.

बदलत्या ऊर्जा गरजा, वाढते शहरीकरण, नवीकरणीय ऊर्जेचा वाढता वापर आणि ग्राहकांच्या अपेक्षा यांचा विचार करता, वितरण व्यवस्थेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे सखोल एकत्रीकरण अपरिहार्य बनले आहे. त्यामुळेच आता वीज वितरण क्षेत्रात डिजिटल बुद्धिमत्ता आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया रुजवण्यावर विशेष भर दिला जात आहे. या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे वीज वितरण कंपन्यांसाठी एकात्मिक डिजिटल स्तर उभारणे. यासाठी 'अॅडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर' (एएमआय), नियंत्रण आणि निरीक्षण प्रणाली तसेच नेटवर्क मालमत्तांचे अधिक अचूक डिजिटल मॅपिंग यांचा अवलंब केला जात आहे. स्मार्ट मीटरच्या वाढत्या वापरामुळे वीजवापराची रिअल टाईम माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे वितरण कंपन्यांना ग्राहकांच्या वापराच्या पद्धती, भारातील चढउतार आणि नेटवर्कवरील ताण यांचे अधिक स्पष्ट चित्र मिळू लागले आहे. याचबरोबर 'डेटा ॲनॅलिटिक्स' आणि ऑटोमेशन साधनांच्या मदतीने वीज वितरण अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तंत्रज्ञानाच्या या नव्या टप्प्यात ड्रोनसारख्या आधुनिक साधनांचाही वापर वाढत आहे. नेटवर्क मालमत्तांची तपासणी, देखभाल आणि निरीक्षण यासाठी ड्रोनचा वापर केल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, सुरक्षित व अचूक होत आहे. परिणामी, नेटवर्क नियोजन अधिक परिणामकारक बनत असून आवश्यक त्या भागांमध्ये वेळेवर सुधारणा आणि गुंतवणूक करता येत आहे. यामुळे वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारण्यास आणि वितरणातील नुकसान कमी करण्यास मदत होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### ऋण काढून सण साजरे करणे कितपत योग्य?

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. पण कशाची स्पर्धा करायची याला काही मर्यादा नाही. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यात स्पर्धा असते आणि या स्पर्धेतून पुढे जाण्याची संधी मिळते. पण आजकाल अगदी विवाहापासून प्रत्येक गोष्टीची स्पर्धा सुरू झाली आहे आणि त्यासाठी ऋण काढून सण साजरा करायला देखील मागे पुढे पाहिले जात नाही. सध्या अधिक महिना सुरू आहे आणि त्यात मुलगी-जावई हे लक्ष्मी-विष्णू रूप म्हणून त्यांचे पूजन केले जाते. पण आज पूजन बाजूला राहिले आणि सोशल मीडियावर दिखावा अधिक केला जात आहे. प्रत्येक जण आम्ही अधिकाचे वाण कसे आणि किती दिले हे दाखवून दिले जात आहे. अगदी अंगणापासून सगळ्या घरात केलेली सजावट आणि त्यावर केलेला अमाप खर्च तर किती असावा याला काहीही मर्यादा नाही. सोने-चांदीचे भाव गगनाला भिडले आहे. महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. रोजची जगण्याची तडजोड करणे अतिशय कठीण झाले आहे. इथे मनातला भाव कमी आणि पैशांचा पाऊस अधिक दिसतो. जावयाला काही देताना त्या घरात खर्चाचा किती ताण येत असेल याची कल्पना देखील करता येत नाही. आज सगळ्यांकडे सगळे असते. अगदी ओसंडून वाहत असते, पण तरीही अधिकाचा हव्यास मात्र सुटत नाही. कोणताही सण-उत्सव हा नाती जपणारा असतो. त्यातून मन प्रसन्न व्हायला हवे, जिव्हाळा, प्रेम वाढायला हवे तरच नाती दृढ होतील, हे लक्षात घेतले पाहिजे. सण, उत्सव हे दडपण न ठेवता साधेपणाने साजरे केले तर ते ओझे नाही तर खरा उत्सव होईल.


**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### व्याप्त काश्मीर

'व्याप्त काश्मिरात आंदोलनाचा भडका' शीर्षकांतर्गत मंगळवार, ९ जून २०२६ च्या तरुण भारतमधील बातमी वाचली. याच आशयाची बातमी इतर वर्तमानपत्रांतसुद्धा वाचण्यात आली. मात्र एक फरक आवर्जून लक्षात आला, तो म्हणजे तरुण भारतमध्ये कुठेही 'पाक' हा शब्द वापरलेला नाही. इतर वर्तमानपत्रांत मात्र 'पाकव्याप्त' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला. तरुण भारतच्या या निर्णयाचे मी स्वागत करतो. काश्मीर हा भारताचाच भूभाग आहे आणि तो राहील, ही ठाम भूमिका घेऊनच फक्त 'व्याप्त' हा उल्लेख करणे म्हणजे खरा राष्ट्रीय बाणा आहे. तरुण भारतचे अभिनंदन आणि राष्ट्रवादी भूमिका कायम जपत राहावी, ही अपेक्षा.

**प्रकाश चोपडा**/यवतमाळ. ९४२२१९२७२७

### महिलांनी मानसिकरीत्या तयार असावे



'कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षा होणार भक्कम' ही बातमी दिलासादायक नक्कीच आहे पण फक्त अंतर्गत समिती स्थापन करून फारसे काही होत नाही हे वास्तव आहे. अनेक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती असतात तरी कॉर्पोरेट जिहाद होतोच ना? कार्यालयीन कामकाजात महिलांना दुय्यम समजणारे अनेक जण असतात तर महिला बॉस सहन न होणारेही असतातच. महिलांनी अंतर्गत समितीकडे तक्रार केली तरी तिला न्याय मिळेलच याची शाश्वती नसते. कारण तक्रार मागे घेण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जाऊ शकतो, नोकरी जाण्याची भीती तर असतेच. एकूणच समाजातील लिंगभेद भाव जोपर्यंत लयाला जात नाही तोपर्यंत महिलांना संपूर्णपणे सुरक्षित वाटणार नाही. महिलांनी सुद्धा स्वतःच्या सुरक्षेसाठी शारीरिक व मानसिक तयारी केलीच पाहिजे.

**माया हेमंत भाटकर**/बाणेर पुणे

### सामाजिक बांधिलकी जपणे महत्त्वाचे

आजच्या आधुनिक आणि धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण स्वतःच्या प्रगतीच्या मागे धावत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जीवन सुलभ झाले असले तरी माणसांमधील आपुलकी, सहकार्य आणि सामाजिक जाणिवा काही प्रमाणात कमी होताना दिसतात. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपणे अधिक आवश्यक बनले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने समाजाच्या हितासाठी कार्य करणे. पर्यावरणाचे संरक्षण करणे, स्वच्छता राखणे, गरजूंना मदत करणे, शिक्षणाचा प्रसार करणे, सामाजिक ऐक्य टिकवणे ही सामाजिक बांधिलकीची काही उदाहरणे आहेत. आज अनेक सामाजिक समस्या आपल्या समोर आहेत. तरुण पिढीने सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन समाज परिवर्तनासाठी योगदान दिले पाहिजे. सामाजिक बांधिलकीमुळे समाजात एकता, बंधुभाव आणि परस्पर सहकार्य वाढते. समाजाच्या प्रगतीसाठी केवळ सरकार किंवा काही संस्था जबाबदार नसतात. प्रत्येक नागरिकाचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो. समाजाच्या विकासात आपला सक्रिय सहभाग असला तरच एक सुसंस्कृत, प्रगत आणि आदर्श समाज निर्माण होऊ शकतो. म्हणून प्रत्येकाने सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान ठेवून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

# जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी करा - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी

## माजी आ.पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख आणि अमर देशमुख यांचे निवेदन

**अंबाजोगाई :** कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी करावी अशी मागणी करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात पंढरपूर येथे शेतकरी कर्जमाफीसाठी सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला केज आणि परळी विधानसभा मतदारसंघाच्या वतीने जाहीर पाठिंबा दर्शवत शेतकऱ्यांच्या भावना शासन दरबारी पोहचवण्यासाठी तहसीलदार अंबाजोगाई यांच्या मार्फत राज्य सरकारला माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रदेश उपाध्यक्ष राजेसाहेब देशमुख आणि तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी निवेदन दिले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसीलदार अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी सरकारने नुकतीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. या योजनेतील जाचक अटी-शर्थी बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे तसेच राज्यभरातील लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट आहे. परिणामी संबंधित शासन निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे. या योजनेत सन 2019 ते 2026 दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेले अल्पमुदत पीककर्जाची 2 लाख रूपयांपर्यतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी 2019 च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे त्या शेतकऱ्यांना केबळ 50 हजार रूपयांची कर्जमाफी मिळणार आहे. 2019 साली राज्यातील सुमारे 33 लाख



शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घेतला होता. याचाच अर्थ यंदाच्या कर्जमाफीतून या 33 लाख शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळणार नाही. सदरील योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज 2 लाखांहून अधिक आहे त्यांनी एकरयेल समझोता (OTS) अंतर्गत 2 लाखावरील रक्कम भरली तरच त्यांना 2 लाख रूपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी 2019 च्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे आणि सध्या त्यांचे कर्ज 50 हजारांहून अधिक आहे त्यांनी उर्वरित रक्कम भरल्यानंतरच त्यांना 50 हजार रूपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील अटींनुसार ज्या शेतकऱ्यांनी सन 2022-23, सन 2023-24, सन 2024-25 यापैकी कोणत्याही दोन वर्षातील पीक कर्जाची वेळेवर परतफेड केली असेल त्यांना 50 हजार रूपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. परंतु, हा प्रोत्साहनपर लाभ मिळविण्यासाठी त्या शेतकऱ्यांनी सन 2025-26 आणि सन 2026-27 चे पीककर्ज भरले असणे आवश्यक आहे.

याचा अर्थ असा होतो की जर शेतकऱ्याला प्रोत्साहनपर अनुदान हवे असेल तर आधी शेतकऱ्यांना आधीच्या दोन वर्षांचे आणि 2025-26 आधिकाधिक 7 चे असे एकूण चार वर्षांचे कर्ज भरणे बंधनकारक आहे. त्यामुळे आमच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. त्या अशा 1) 2019 च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी केवळ 50 हजार रूपयांपर्यतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट 2 लाख रूपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी., 2) एकरकमी समझोता (ओटीएस) योजनेत लाखांहून अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना 2 लाखांवरील रक्कम आधी भरण्याची अट न घालता सरकारने सरसकट 2 लाख रूपयांपर्यतची कर्जमाफी करावी., 3) 2019 च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील 50 हजार रूपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना 2 लाख रूपयांपर्यत कर्जमाफी लागू करावी., 4) प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अट रद्द करावी., 5) 2017 च्या कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या केबळ लाभार्थ्यांनाच लाभापासून वंचित राहिलेल्या 6.56 लाख शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफीचा लाभ द्यावा., 6) पीकविमा योजनेतील शेतकरीविरोधी जाचक अटी रद्द करून 1 रूपयात पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी., 7) पेरणीपूर्व कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांच्या खात्यात आवश्यक रक्कम जमा करावी, जेणेकरून त्यांना पेरणीसाठी आर्थिक मदत मिळेल. या सदरील मागण्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. गेली तीन वर्षे सततची नापिकी, नैसर्गिक आपत्ती, शेतमालाचे कोसळलेले दर यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी कोणत्याही अटी शर्थीशिवाय सरसकट कर्जमाफी करण्याची राज्यसरातील शेतकऱ्यांची मागणी आहे. तरी आपण याबाबत शासनास अवगत करावे व शेतकऱ्यांची मागणी शासनापर्यत पोहोचवावी अशी नम्र विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

सदरील निवेदनावर अमर देशमुख (तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार) अंबाजोगाई, पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसमा मतदारसंघ.), राजेसाहेब देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार, व्यंकटेश चामनर, प्रमोद भोसले, सुधाकर जोगदंड, दिपक शिंदे, केशव नाना ढगे, प्रविण देशमुख, हमीद चौधरी, प्रशांत पवार, हमीद चौधरी, सुजित थोरात, अश्रुबा करडे, सलीम पिंजारी, रवि सोमवंशी, महेश जगताप आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शंकर बरडे खून प्रकरणात आरोपींना मोठा झटका; पाचही जामीन अर्ज फेटाळले

**बीड । प्रतिनिधी :** पाडळी येथील भिल्ल समाजातील शंकर यांच्या गाजलेल्या खून प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत पाचही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. या निर्णयामुळे आरोपींना मोठा धक्का बसला असून मृत शंकर यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याच्या आशा अधिक बळकट झाल्या आहेत. या प्रकरणातील सुनावणीदरम्यान फिर्यादी पक्षाच्या वतीने ॲड.सुर्यकांत पवार यांनी अत्यंत प्रभावी आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम युक्तिवाद सादर केला. गुन्ह्याचे गंभीर स्वरूप, तपासादरम्यान समोर आलेले पुरावे, साक्षीदारांवर दबाव आणला जाण्याची शक्यता तसेच आरोपींना जामीन दिल्यास समाजात चुकीचा संदेश जाऊ शकतो, या सर्व बाबी त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.

ॲड. पवार यांच्या सविस्तर मांडणीची दखल घेत न्यायालयाने आरोपींची बाजू फेटाळत नाना जानू सरवदे,अंकुश गिरजाप्पा अवंतकर, अक्षय राजाभाऊ सरवदे, सोनाजी भिवसेन सरवदे, अशोक(पिनु) सखाराम सरवदे 5 आरोपींची जामीन अर्ज नामंजूर केले. त्यामुळे खून प्रकरणाच्या तपासाला आणि न्यायप्रक्रियेला महत्त्वपूर्ण बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयाचे भिल्ल समाजातून स्वागत करण्यात येत असून परिसरात समाधान व्यक्त केले जात आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने घेतलेली ही कठोर भूमिका न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी असल्याची प्रतिक्रिया कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पाडळी खून प्रकरणाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असताना आलेला हा निर्णय न्यायप्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे फिर्यादी पक्षाच्या वतीने ॲड.सुर्यकांत पवार यांनी अत्यंत प्रभावी आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम युक्तिवाद सादर केला यावेळी ॲड. सुर्यकांत पवार यांना ॲड. शेख इम्रान, ॲड. पंकज रायभोळे, ॲड. शेख अनवर तसेच इबात शेख यांनी सहकार्य केले.

## माजलगाव भाजपाच्या वतीने पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी सिद्धेश्वर मंदिरात महाआरती संपन्न

### सर्वाधिक काळ पंतप्रधान पद भूषवत नरेंद्र मोदी यांनी केले समर्पण भावनेने सेवा कार्य : रत्नपारखी

**माजलगाव :** देव_देश_धर्मासाठी_समर्पण ,_निस्वार्थ भावनेने अविरतपणे सेवा कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी भारतीय लोकशाहीच्या इतिहासात लोकप्रिय पंतप्रधान म्हणून व जनादेशाचा नवा विक्रम प्रस्थापित केला असून पंतप्रधान_म्हणून_सर्वाधिक ४ हजार ३९९ दिवसांचा_यशस्वी_कार्यकाळ #पूर्ण_केला आहे. त्यांचा हा यशस्वी कार्यकाळाचा आलेख असाच उत्तरोत्तर वाढत रहावा व त्यांना दीर्घायुष्य लाभावे म्हणून *लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे मा खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे जिल्हाध्यक्ष श्री शंकर भाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आज माजलगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये पूजा व महाआरती संपन्न झाली. या धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी माजलगाव भारतीय जनता पार्टीचे



शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले की नरेंद्र मोदी यांचे अविरतपणे सेवा कार्य असेच चालू राहावे म्हणून श्री सिद्धेश्वर चरणी नतमस्तक होऊन श्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हातून देशाची अविरतपने सेवा कार्य चालत राहो आणि त्यासाठी त्यांना उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभावे म्हणून माजलगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या चरणी प्रार्थना करून मंगलमय उत्साह पूर्ण वातावरणात महापूजा व महाआरती करण्यात आली.

नरेंद्र मोदी यांनी बारा वर्ष विकासाचे पर्व पूर्ण करत व जनतेचा अतूट विश्वास जिंकत देशाच्या इतिहासात एक नवा सुवर्ण अध्याय रचत सर्वाधिक जास्त दिवसाचा पंतप्रधान म्हणून कार्य करण्याचा नवा विक्रम प्रस्थापित केला. विकास सुशासन जनकल्याण डिजिटल क्रांती अन्न वस्त्र निवारा पायाभूत सुविधा राष्ट्रीय सुरक्षा आणि सर्वात महत्वाचे जागतिक पटलावर तिरंग्याची शान उंचावणारे नरेंद्र मोदी यांनी विकासाभिमुख नेतृत्व करत सेवा कार्य करण्याचा नवा विक्रम रचला आहे आणि त्यामुळे ते पुढील काळात या विकासाच्या सुवर्णयुगाची ते साक्षी असल्यामुळे युगप्रवर्तक म्हणूनच ओळखले जातील.

याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके डॉ प्रशांत पाटील सरचिटणीस पवन मोगरेकर शहर उपाध्यक्ष अविनाश कांडुरे रामेश्वर चव्हाण सोशल मीडियाचे दत्ता महाजन शहर चिटणीस विनोद लड्डा किशोर सावंत या कार्यक्रमाचे संयोजक भाजपा उपाध्यक्ष उमेश जाधव सहसंयोजक युवा नेते राम शिंदे , सतीश जोशी सुशांत जाधवर भरत जोशी सह पदाधिकारी शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस.के.एच. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जागतिक दृष्टीदान दिन साजरा

बीड दि.12 (प्रतिनिधी):- येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जागतिक दृष्टीदान दिन साजरा करण्यात आला. रोटरी क्लब बीड, जिल्हा शासकीय रुग्णालय व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक दृष्टिदान दिन साजरा करून त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल बोरा तसेच सचिव डॉ. प्रकाश कोंका, संचालक डॉ. बजाज, सुरेश बुद्धदेव, सौ चंद्रभागा गुरव, सौ.सुप्रिया घरे नेत्र चिकित्सा अधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल आणि शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घरे मॅडम यांनी दृष्टी दान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच डॉ. कौगा व निलेश जगदाळे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल बोरा यांनी दृष्टिदानाबद्दल विद्यार्थ्यांना शपथ दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी देखील दृष्टिदानावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून दिले...या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेश्मा मुळे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार डॉ. मीना हंगे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध योजनांसाठी अर्ज करावेत

**बीड, दि.11 (जिमाका):** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत अनुसूचित जातीतील गरजू आणि तरुण उद्योजकांसाठी आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करिता विशेष घटक योजना आणि बीजभांडवल योजना राबविण्यात येत आहेत. या दोन्ही योजनांसाठी जिल्ह्याला प्रत्येकी २० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, पात्र इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी mahadisha.mpbcdc.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने कर्ज मागणी अर्ज भरायचा आहे. अर्जदाराने स्वतःच्या वैयक्तिक ई-मेल आयडीचा वापर करूनच अर्ज करणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची मूळ प्रत आणि आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती लाभार्थ्याने स्वतः जिल्हा कार्यालयात आणून जमा करायच्या आहेत. कोणत्याही त्रयस्त व्यक्तीमार्फत आलेले अर्ज किंवा कागदपत्रे स्वीकारली जाणार नाही. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## परळी पोलिसांचा छापा;20 किलोहून अधिक गांजा जप्त, दोघांवर गुन्हा

परळी — तालुक्यात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात धर्मपुरी मध्ये पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल 20 किलो 340 ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे बाजारमूल्य 9 लाख 77 हजार 320 रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख बाबुलाल शेखलाल अत्तार (वय 55) आणि वसीम बाबुलाल अत्तार, दोघेही रा. धर्मापुरी, ता.



परळी, यांच्या राहत्या घरातून ही कारवाई करण्यात आली. धर्मापुरी परिसरात अंमली पदार्थांची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार 11 जून रोजी सायंकाळच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला.

छाप्यामध्ये घरात ठेवलेल्या एका पांढऱ्या पोत्यात उग्र वास येणारा हिरवट रंगाचा पदार्थ आढळून आला. तपासणी व वजन केल्यानंतर तो 20 किलो 340 ग्रॅम गांजा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तात्काळ गांजा जप्त करून आरोपींना ताब्यात घेतले.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी धनराज जारवाल यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 274/2026 नोंद करण्यात आला आहे. आरोपी आर्थिक फायद्यासाठी अंमली पदार्थांची विक्री करत असल्याचा आरोप असून त्यांच्याविरोधात एनडीपीएस कायदा 1985 च्या कलम 20 आणि 29 अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक एम. ए. सय्यद करीत असून अंमली पदार्थांच्या साखळीचा उलगडा करण्यासाठी पोलिसांकडून अधिक चौकशी सुरू आहे.

## पुरुषोत्तमपुरी येथे भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना

**बीड,दि.१२ (जिमाका):-** जिल्ह्यात माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे दि. १० जून २०२६ रोजी गोदावरी नदी पात्रात घडलेल्या बोट दुर्घटनेनंतर बीड जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, भविष्यात अशी कोणतीही जीवितास धोका निर्माण करणारी अनुचित घटना टाळण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने अत्यंत कडक पावले उचलली आहेत. पुरुषोत्तमपुरी आणि गोदावरी नदी परिसरात भाविकांची होणारी अलोट गर्दी आणि संभाव्य धोके लक्षात घेऊन प्रशासनाने १० कलमी नियमावली जारी केली असून, संपूर्ण परिसरात २४ तास शोध व बचाव पथके तैनात करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत.

पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सुरक्षा वाऱ्यावर सोडली जाणार नाही, अशी कडक भूमिका प्रशासनाने घेतली आहे. नदीकाठ, घाट परिसर आणि होडी वाहतूक केंद्रांवर चोवीस तास कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि आपत्कालीन मदतीसाठी होमगार्डच्या प्रशिक्षित जवानांना गस्त घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

केवळ शासकीय यंत्रणाच नव्हे, तर स्थानिक पातळीवरील मनुष्यबळाचाही यासाठी वापर केला जाणार आहे. आपदा मित्र आणि आपदा सखी या स्वयंसेवकांची स्वतंत्र पथके मैदानात उतरवण्यात आली आहेत. नदीकाठावर प्रशिक्षित स्थानिक पोहणाऱ्यांची, जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना आवश्यक साहित्यासह सज्ज राहण्यास सांगितले आहे.

**गोदावरी नदी परिसरात 24 तास शोध व बचाव पथके तैनात**

**गर्दी आणि संभाव्य धोके लक्षात घेऊन प्रशासनाकडून 10 कलमी नियमावली जारी**

याशिवाय सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक भाविकांना सुरक्षित मार्गदर्शनासाठी मदत करणार आहेत. नदी पात्रात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेणाऱ्या होडी चालकांवर आता प्रशासनाची करडी नजर असणार आहे. सर्व होडी चालकांकडे वैध परवाने असण्याची खात्री केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक होणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

सुरक्षेसाठी २४ तास कार्यरत असणारी शोध व बचाव पथके, नदी परिसरात पुरेशा प्रमाणात लाईफ जॅकेट, लाईफ बॉय आणि दोरखंड आपत्कालीन परिस्थितीसाठी बचाव नौका, भाविकांच्या जागरूकतेसाठी नदीकाठी माहिती व सूचना फलक लावण्यात आली आहेत.

माजलगावचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक, स्थानिक ग्रामपंचायत आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यात समन्वय साधून आपत्कालीन प्रतिसाद २४ तास ॲक्टिव्ह मोडवर ठेवण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी सर्व संबंधित विभागांना या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असून, केलेल्या कारवाईचा अनुपालन अहवाल तातडीने सादर करण्यास सांगितले आहे. आदेशात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाईचे संकेतही जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

## हिंदू खाटीक समाजातील उमेदवारांना आवाहन

**बीड,दि.१२(जिमाका):-** मागासवर्गीय समाजातील घटकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळातर्फे सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत विशेष घटक योजना आणि बीजभांडवल योजना या दोन महत्त्वाच्या योजनांसाठी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र हिंदू खाटीक समाजातील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. या वर्षी दोन्ही योजनांसाठी प्रत्येकी केवळ ३ लाभार्थ्यांचे मर्यादित उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुकांनी अर्ज पूर्ण भरून, त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडून जिल्हा कार्यालयात स्वतः उपस्थित राहून मूळ प्रत सादर करावी. कोणत्याही त्रयस्त व्यक्तीमार्फत अर्ज किंवा वैधानिक दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत. तरी योजनांची सविस्तर माहिती आणि अर्जासाठी लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, बीड संपर्क क्र. ०२४४२-२२२६१४ येथे संपर्क साधावा. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## चकलांबा व माजलगाव ग्रामीण भागातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस

**बीड :** जिल्ह्यातील विविध घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांमधील आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे समांतर तपास सत्र सुरू आहे. या मोहिमेत गुन्हे शाखेच्या पथकाला मोठे यश आले असून चकलांबा आणि माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. पोलिसांच्या या धडक कामगिरीमुळे चोरी प्रकरणातील आरोपींसह मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले असून गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे.

चकलांबा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यानुसार, गेवराई रोडवरील सूरज बिअर बार अँड परमिट रूम येथे अज्ञात चोरट्यांनी हॉटेलची खिडकी तोडून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी विविध कंपन्यांच्या दारूच्या बाटल्या आणि गल्ल्यातील रोख रक्कम चोरून नेली



होती. या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. तपासादरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, संशयित आरोपी रोडने गेवराईकडे येत आहेत. या माहितीवरून पथकाने महार टाकळी परिसरात सापळा रचून कार्तिक विरसिंग नागपुरे, आदित्य मयूर जाधव आणि हर्षवर्धन मोहन रेड्डी या तिघांना ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत या तिघांनी इतर साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली असून त्यांना पुढील कारवाईसाठी चकलांबा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दुसऱ्या एका कारवाईत, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून केला जात होता. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि स्थानिक पातळीवर केलेल्या तपासाच्या आधारे पोलिसांनी एका विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता, चोरीस गेलेला सुमारे ऐंशी हजार पाचशे रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांना हस्तगत करण्यात यश आले आहे. या दोन्ही कारवायांमुळे बीड जिल्ह्यातील दोन मोठ्या चोऱ्यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख तसेच स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कामगिरीत माजलगाव ग्रामीण आणि चकलांबा येथील पोलीस उपनिरीक्षक आणि अंमलदारांच्या वेगवेगळ्या पथकांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत कमोडिटी कार्यशाळा संपन्न

## हळदीच्या गुणवत्ता आधारीत व्यापाराची संकल्पनाबाबत मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**

शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफपीओ) वायदा बाजाराची माहिती, हळदीच्या गुणवत्ता-आधारित व्यापाराची संकल्पना आणि बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय कमोडिटी जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सुमारे १५० शेतकरी, एफपीओ प्रतिनिधी, कृषी उद्योजक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित विविध घटकांनी सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. शेळके, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अविनाश लहने, स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी जी. बी. बंटेवाड तसेच ललित बहाले, गुणवंत पाटील हंगरगेकर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील प्रमुख हळद उत्पादक क्षेत्रांपैकी असलेल्या मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना कमोडिटी बाजारपेठेची माहिती थेट उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेत बाजारपेठेतील किंमत निर्धारण, बाजारातील चढ-उतार आणि जोखीम व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या कार्यशाळेदरम्यान शेतकऱ्यांना मंडई व एक्सचेंजमधील किमतींतील फरक, किमतींच्या निर्धारणामागील घटक तसेच किंमतीतील चढ-उतारांपासून संरक्षण मिळविण्यासाठी उपलब्ध साधनांची माहिती देण्यात आली. याशिवाय वायदा बाजाराविषयी असलेले गैरसमज दूर करणे, किंमत ठरविण्याचे फायदे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांना पूरक ठरणाऱ्या पर्यायी बाजारपेठा, मालगोदाम व्यवस्था, गुणवत्ता निकष आणि आधार केंद्रांच्या उभारणीसंदर्भातील बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

कृषी कमोडिटी विश्लेषक श्रीकांत कुवळेकर यांच्या मध्यस्थीखाली झालेल्या पॅनेल चर्चेत वायदा बाजाराची कार्यपद्धती, नियामक तरतुदी आणि बाजारातील व्यवहार प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच एफपीओ प्रमुख सूर्यजी शिंदे यांनी हळद वायदा बाजार आणि ऑप्शन्स करारांमधील स्वतःचा अनुभव सहभागींसमोर मांडला. गुणवत्ता निकष, वाहतूक खर्च, विक्री खर्च आणि व्यवहाराची वेळ स्वतः ठरवून बाजारपेठेतील संधींचा कसा लाभ घेता येतो, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या माध्यमातून एफपीओंना उपलब्ध असलेल्या आर्थिक सहाय्य योजनांची माहितीही देण्यात आली. यामध्ये तपासणी खर्चाची १०० टक्के परतफेड तसेच स्वच्छता, वर्गवारी, वाळवणे आणि वाहतूक खर्चाच्या ७५ टक्क्यांपर्यंत परतफेडीची तरतूद असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एक्सचेंज-आधारित व्यवहारांमध्ये शेतकरी गटांचा खर्च कमी होण्यास मदत होत असल्याचे नमूद करण्यात आले. शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी (एफपीओ) आधुनिक बाजारपेठेतील संधींचा लाभ घेण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनसीडीईएक्सच्या किसान कॉल सेंटरशी १८००-१०३-४८६१ या क्रमांकावर व एनसीडीईएक्सचे स्थानिक प्रतिनिधी रोहन धांडे (मो. ९१३०८९७१०५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.

# शासकीय वेतन देयके ई-बिल संदर्भात तांत्रिक ज्ञान आत्मसात करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**

शासनाच्या वित्तीय व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता आणि वेळेची बचत साधण्यासाठी शासकीय वेतन देयके ई-बिल पद्धतीने सादर करण्याची प्रणाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या प्रणालीचा यशस्वी वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आवश्यक तांत्रिक ज्ञान आत्मसात करून ई-बिल प्रणालीचा काटेकोरपणे वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शासकीय वेतन देयके ई-बिल पद्धतीने सादर करण्याबाबत अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी जिल्हा कोषागार अधिकारी मंजीत गोरेगावकर, अपर कोषागार अधिकारी बी.जी. कुरे, उपकोषागार अधिकारी व्ही.जी. गोविंदवार, कळमनुरीचे उपकोषागार अधिकारी श्री. सातपुते, औंढा नागनाथचे उपकोषागार अधिकारी प्रसाद कमलेश्वर, विविध विभागांचे आहरण व संवितरण अधिकारी, लेखाधिकारी, अधीक्षक तसेच संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, राज्य शासनाने शासकीय कामकाजात डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करण्यावर भर दिला असून ई-बिल प्रणाली ही त्यातील एक महत्त्वपूर्ण पायरी आहे. पारंपरिक पद्धतीने वेतन देयके सादर करताना लागणारा वेळ, कागदपत्रांची पूर्तता आणि विविध स्तरांवरील प्रक्रियेमुळे निर्माण होणारा विलंब टाळण्यासाठी ई-बिल प्रणाली उपयुक्त ठरत आहे. या प्रणालीमुळे वेतन देयकांची प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक व त्रुटीरहित होणार आहे. ई-बिल प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे कार्यालयीन कामकाजाचे डिजिटायझेशन होऊन कागदविरहित प्रशासनाला चालना मिळणार आहे. तसेच देयकांच्या प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, वेळेत मंजुरी मिळविणे आणि वित्तीय शिस्त राखणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात अंकुश दवाडे, राहुल गुमे, वैभव राऊत या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी ई-बिल प्रणालीमध्ये वेतन देयके तयार करणे, आवश्यक माहिती भरणे, देयकांची ऑनलाइन सादर प्रक्रिया, त्रुटींचे निराकरण तसेच प्रणालीच्या विविध तांत्रिक बाबींविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कोषागार अधिकारी मंजीत गोरेगावकर यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अविनाश भगत यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमात सहभागी होण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**

आयुष मंत्रालय व पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार तसेच हॅबिल्ड हेल्थ टेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ६.१५ ते ७.३५ या वेळेत युट्यूबच्या माध्यमातून विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये अधिकृत नोंद करण्याचा मानस असून, देशभरातून मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे.

हा उपक्रम जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. याअंतर्गत गावातील सर्व नागरिक, महिला बचत गट, युवक मंडळे, शाळा, अंगणवाडी सेविका तसेच विविध सामाजिक संस्थांना या उपक्रमाची माहिती देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी दवंडी, व्हॉट्सअॅप गट, नोटीस बोर्ड आदी माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रत्येक सहभागधारकाने १८००-३१५-७००८ या टोल-फ्री क्रमांकावर मिस्ड कॉल देणे आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तीच्या व्हॉट्सअॅपवर युट्यूब लिंक प्राप्त होईल. त्यानंतर प्रत्येक सहभागधारक आपल्या मोबाईलवरून स्वतंत्रपणे लॉग-इन करून योग सत्रात सहभागी होऊ शकेल. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रत्येक नोंदणीकृत सहभागधारकाचे डिव्हाईस अधिकृतरीत्या नोंदविण्यात येणार आहे. दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ६.१५ ते ७.३५ या वेळेत आयोजित युट्यूब लाईव्ह योग सत्रात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन भारताच्या या ऐतिहासिक उपक्रमास हातभार लावावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले आहे.



**हिंगोली- अंभेरी येथील साठवण तलावात परदेशी पक्षी दाखल झाले असून सध्या उन्हाळा संपूनही अद्याप पाऊस पडत नसल्यामुळे परदेशी पक्षी तलाव परिसरात भ्रमण करतांना छायाचित्रकार सुनील पाठक यांनी त्यांच्या कॅमेऱ्यात टिपलेले मनमोहक छायाचित्र.**

## संक्षिप्त वृत्त


### शाळानिहाय पुस्तकांचे वाटप सुरू



हिंगोली- समग्र शिक्षा अभियानांतर्गत औंढा नागनाथ तालुक्यातील शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वाटप करण्यासाठी आलेली मोफत पुस्तके गुरुवारी (ता. ११) जिल्हा परिषद शाळांच्या केंद्रावर, तर खासगी अनुदानित शाळेला गटसाधन केंद्राने वाटप केले. औंढा नागनाथ तालुक्यात ८३ हजार ४०३ पाठ्यपुस्तके त्यात मराठी व इग्रजी सेमी माध्यम ९९ हजार ४२९ तर उर्दू माध्यम सेमी २५०० मागणी होती. पण मराठी माध्यम व इग्रजी माध्यम सेमी ८१ हजार १५२, उर्दू २ हजार २५१ असे एकूण ८३ हजार ४०३ पुस्तके औंढा गटसाधन केंद्राला प्राप्त झाली. औंढा तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला चार, उर्दू शाळा चार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १४९, अशा १५७ शाळांना तर खासगी अनुदानित उर्दू पाच शाळा व मराठी २४ शाळा अशा एकूण २९ शाळांना गटशिक्षणाधिकारी मो.तोफिक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तके वाटप करणे चालु आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे.

# हिंगोलीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करा- आ. मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**



जिल्ह्याचा शैक्षणिक विकास वेगाने व्हावा आणि स्थानिक विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण मिळावे, यासाठी हिंगोलीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करावे, अशी मागणी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील आणि परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड बुद्धिमत्ता व गुणवत्ता आहे. मात्र, स्थानिक पातळीवर उच्च व तंत्रशिक्षणाच्या पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत.परिणामी, येथील गरीब, शेतकरी, कष्टकरी व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे आणि मुंबई यांसारख्या दूरच्या व मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. मोठ्या शहरांमधील महागडे शिक्षण आणि राहण्याचा मोठा खर्च सामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर आहे. आर्थिक परिस्थिती अभावी अनेक हुशार व होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत.

हिंगोली येथे हक्काचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाल्यास, या भागातील हजारो विद्यार्थ्यांना त्याचा थेट लाभ मिळेल. विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणावर कमी होईल. स्थानिक पातळीवरच दर्जेदार व नामांकित तांत्रिक शिक्षण मिळाल्यामुळे या संपूर्ण परिसराच्या शैक्षणिक, औद्योगिक आणि आर्थिक विकासाला एक नवी दिशा व गती मिळेल जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य आणि या मागास भागाचा सर्वांगीण विकास विचारात घेता,हिंगोली येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरी द्यावी,अशी मागणी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी केली असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

# बँकॉक येथे डॉ. विकास कल्याणकर यांना पर्यावरणीय शाश्वतता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**



तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव येथील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास बळीराम कल्याणकर यांना बँकॉक (थायलंड) येथे आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या आंतरराष्ट्रीय क्लायमेट स्मार्ट नॅचरल रिसोर्सेस मॅनेजमेंट फॉर सस्टेनेबल अग्रिकल्चर इन लाईफ सायन्सेसया परिषदेत एक्सीडेंट इन इकोसिस्टीम सस्टेनेबिलिटी अवॉर्ड २०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डॉ. विनय कुमार चक्रवर्ती डॉ. रमेश राठोड, भूपेंद्र सिंग, जोगिंदर सिंग, डॉ. अनुप कुमार तसेच देवांशी गुप्ता यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करून करण्यात आला. पर्यावरणाची चिरस्तायीता प्राणीशास्त्र या क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन डॉक्टर विकास बळीराम कल्याणकर यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

त्यांच्या यशामुळे तोष्णीवाल कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सेनगाव संपूर्ण हिंगोली जिल्हा याचा शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला आहे. ही आंतरराष्ट्रीय परिषद ५ जून ते आठ जून २०२६ रोजी एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बँक ऑफ थायलंड येथे आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी अनेक महाविद्यालयांचे प्राध्यापक व विभाग प्रमुख उपस्थित होते त्यात प्रमुख सह डॉ. तनवीर पठाण, डॉ. पी आर मोरे, डॉ.अशोक मुंडे, डॉ. संतोष रणखांब, डॉ. राम हरी मायकर, डॉ. विकास कल्याणकर, युवा शास्त्रज्ञ रणजीत राऊत, डॉ. सुनील खाडे, डॉ. यास्मिन शेख, डॉ. संगीता डोंगरे, डॉ. प्रियंका गायकवाड, डॉ. आयेशा दुरानी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यानिमित्त त्यांचा समाजाच्या विविध स्तरातून अभिनंदन व गौरव होत आहे. यानिमित्त त्यांचा गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बी आर तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस जी तळणीकर व इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

# रिसाला बाजार येथील नागरिकांना देण्यात आलेल्या नोटीसांबाबत सामूहीक सुनावणी घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**



रिसाला बाजार तसेच इतर परिसरातील अनेक नागरिकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५० आणि ५३ अंतर्गत नोटीसा प्राप्त झाल्या आहेत. सदर नोटीसांमुळे नागरिकांमध्ये भिती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. वास्तविक सदरील रहीवाशी ४० ते ७० वर्षापासून या भागात वास्तव्यास असून त्यांच्याकडे सर्व प्रकारचे पुरावे आहेत. त्यामुळे प्रशासनाने पुरेशी व न्याय सुनावणीची संधी द्यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी शहरातील रिसाला बाजार व मोंढा परिसरातील नागरिकांना महसुल विभागाच्यावतीने नोटीसा देण्यात आल्या होत्या. रिसाला बाजार भागात अनेक कुटुंबे ४० ते ७० वर्षापासून वास्तव्यास आहेत. त्यांच्याकडे पी आर कार्ड, नोंदणीकृत खरेदीखत, नगर पालिकेच्या कर पावत्या, वीज जोडणी, पाणीपट्टी व इतर शासकीय अभिलेख उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी या मालमत्तांची नोंद घेतली असून नागरिकांकडून कर व इतर शुल्कही स्विकारण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत अचानकपणे संपूर्ण भाग शासकीय जमीन असल्याचा दावा करून नागरिकांना नोटीसा देण्यात आल्यामुळे त्यांच्या मालमत्तेच्या हक्कांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक नागरिक आर्थिकदृष्टया दुर्बल असून त्यांना स्वतंत्रपणे लढा देणे कठीण आहे. त्यामुळे प्रशासनाने सर्व नागरिकांना पुरेशी व न्याय्य सुनावणीची संधी द्यावी, संबंधित जमीन शासकीय असल्याचे अभिलेख व पुरावे सार्वजनिकरित्या उपलब्ध करावेत, मालमत्ता धारकांकडील कर पावत्या, खरेदी खत तसेच पी आर कार्ड आदी अभिलेखांचा योग्य विचार करावा तसेच अंतीम निर्णय होईपर्यंत कोणतीही बेदखली अथवा दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये, नागरिकांची संयुक्त बैठक आयोजित करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात यावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदनावर नगरसेवक कैलाश शहाणे, पंकज अग्रवाल, राजेश अग्रवाल, किशोर लोलगे, राजेश रामेश्वरे, प्रदीप दहीवाळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची खा. रामराव वडकुतेंनी घेतली सदीच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जून**

नुकतेच राज्यसभा सदस्यपदी बिनविरोध निवडून आलेले भाजपाचे खासदार रामराव वडकुते यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सहपरिवार सदिच्छा भेट घेतली. या शिष्टाचार भेटीदरम्यान खासदार रामराव वडकुते यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदुताई रामराव वडकुते, शशिकांत वडकुते आणि दिलीप वडकुते उपस्थित होते.

या भेटीदरम्यान खासदार वडकुते यांनी महामहिम राष्ट्रपतींशी सविस्तर संवाद साधला. या प्रसंगी प्रामुख्याने मराठवाडा परिसर तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार रामराव वडकुते म्हणाले की, विकसित महाराष्ट्र आणि 'विकसित भारत' घडवण्यासाठीच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये राष्ट्रपतींचे मोलाचे मार्गदर्शन, अफाट ज्ञान आणि दूरदृष्टी आम्हांला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व शुभेच्छांबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या प्रेरणेतून जनकल्याण, विकास आणि राष्ट्रनिर्माणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# महसूल विभागाच्या पुनर्रचना प्रक्रियेला वेग

# किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय व इस्लापूर येथे अपर तहसीलदार कार्यालयाच्या प्रस्तावावर हरकती-सूचना मागविणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १२ जुन -**

राज्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या पुनर्रचना प्रक्रियेला राज्य शासनाने वेग दिला असून नवीन अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय, तहसील व अपर तहसीलदार कार्यालयांच्या निर्मितीबाबत जनतेकडून हरकती व सूचना मागविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महसूल व वन विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी ११ जून रोजी जारी केलेल्या शासनपत्राद्वारे सर्व विभागीय आयुक्तांना याबाबत सूचना दिल्या आहेत.

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय व तहसील कार्यालयांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी तर अपर तहसीलदार कार्यालयांबाबत संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करायची आहे. यासाठी १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करून नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व संबंधित घटकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत.

प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचे दैनंदिन संकलन, तपासणी व विश्लेषण करून संबंधित अधिकाऱ्यांनी आपले अभिप्राय विभागीय आयुक्तांमार्फत १ जुलै २०२६ पर्यंत शासनाकडे सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**किनवटला प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय**

छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत नांदेड जिल्ह्यासाठी किनवट येथे नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किनवट, हदगाव, हिमायतनगर आणि माहूर हे चार तालुके समाविष्ट करण्यात आले आहेत.

सध्या नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नांदेड, धर्माबाद, भोकर, अर्धापूर, कंधार, देगलूर, मुखेड, लोहा, बिलोली, नायगाव, उमरी आणि मुदखेड हे तालुके राहणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील प्रशासकीय कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती हा महत्त्वाचा प्रशासकीय बदल मानला जात आहे.

**इस्लापूर येथे अपर तहसीलदार कार्यालयाचा प्रस्ताव**

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे स्वतंत्र अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याचाही प्रस्ताव शासनाने पुढे आणला आहे. प्रस्तावानुसार इस्लापूर, जलधरा आणि शिवणी ही महसूल मंडळे अपर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यात येणार आहेत.

तर किनवट तहसील कार्यालयाकडे किनवट, बोधडी (बु.), दहेली, मांडवी, उमरी (बा.) आणि सिंदगी (मो.) ही महसूल मंडळे राहणार आहेत. किनवट तालुक्यात एकूण नऊ महसूल मंडळे असून प्रशासकीय कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे.

**नागरिकांना अभिप्राय देण्याची संधी**

नवीन कार्यालयांच्या मुख्यालय, कार्यक्षेत्र आणि प्रशासकीय पुनर्रचनेबाबत नागरिकांना आपली मते मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. स्थानिक पातळीवर विकास, प्रशासनाची उपलब्धता, नागरिकांची सोय आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन शासन अंतिम निर्णय घेणार असल्याने किनवट अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि इस्लापूर अपर तहसीलदार कार्यालयाच्या प्रस्तावाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

महसूल प्रशासनाच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असून, विशेषतः आदिवासीबहुल किनवट, माहूर, हिमायतनगर आणि हदगाव परिसरातील नागरिकांना प्रशासकीय सेवा अधिक जवळ उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्ततेसाठी मुदतवाढ द्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जुन -**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' अंतर्गत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या अर्जांमधील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी किमान १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, या मागणीसाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने समाज कल्याण विभागाचे विशेष समाज कल्याण अधिकारी यांच्या मार्फत समाज कल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळकर यांना पाठविण्यात आले आहे.

### 'एसएफआय' नांदेड जिल्हा कमिटीची मागणी

निवेदनात नमूद केल्यानुसार, मागील शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील असंख्य गरीब, गरजू व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी अर्ज सादर केले होते. मात्र, अनेक अर्जांमध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत. त्रुटींची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाने मुदत दिली होती, परंतु बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण व दुर्गम भागातील असल्याने ऐनवेळी कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, इंटरनेटच्या अडचणी आणि तांत्रिक माहितीचा अभाव यामुळे ते मर्यादित मुदतीत त्रुटींची पूर्तता करू शकले नाहीत.

स्वाधार योजना ही गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मुख्य आधार आहे. केवळ तांत्रिक कारणांमुळे विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिल्यास त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होईल आणि अनेकांना शिक्षण सोडावे लागण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य विचारात घेऊन तात्काळ १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासन स्तरावर या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांना तातडीने न्याय दिला जाईल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. मात्र, यावर सकारात्मक निर्णय न झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी 'एसएफआय' नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा एसएफआयचे चे नांदेड जिल्हा सहसचिव कॉ. पवन जगडमवार यांनी दिला.यांवेळी समता दुरगावकर, निकिता वायवळे, दिपाली ढेपे, मिरा कदम, निलेश इंगोले, अजय, यशवंत, पंकज आदी विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

## थडीसावळीत शेतकरी गटांना महामंडळाकडून बियाणे वाटप

**नांदेड**-बिलोली तालुक्यातील ग्राम थडीसावळी येथील राणा शेतकरी गट व श्री.छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी गटांना कृषी महामंडळाकडून ७२५ सोयाबीन बियाणे बॅगचे वाटप व शेतीत आगामी खरीप हंगामातील पेरणी संदर्भात सखोल माहिती देण्यात आली.यावेळी सगरोळीचे कृषी सहायक बालाजी कानगुलवार यांची उपस्थिती होती.बिलोली तालुक्यातील तब्बल २३ शेतकरी गटांना बियाणे बॅगचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात गटातील शेतकऱ्यांना बीबीएफ वर पेरणी, बियाणे उगवण चाचणी,बीज प्रक्रिया, चार ते पाच सेंटिमीटर खोलीवर पेरणी करणे,१०० मिलिमीटर पाऊस झाल्यावरच पेरणी करणे माती परीक्षण करून खते वापरण्याबाबत व शेती संबंधित इतर योजनांची विस्तृत माहिती देऊन शेतकऱ्यांना सजग करण्यात आले. सदरील बियाणे कासराळी येथील महामंडळ शासकीय गोदामातून हे बियाणे उपलब्ध झाले. यावेळी राणा शेतकरी गटाचे अध्यक्ष युवराजसिंह चौहाण, सचिव शिवदानसिंह ठाकूर,छत्रपती महाराज गटाचे रामचंद्र सानेबोईनवाड,सदस्य शिवकुमार पाटील,सदस्य सचिन हांद्रे द न्यूज तालुका प्रतिनिधी,सदस्य रूद्रयअप्पा मठपती,मल्लिकार्जुन मठपती,अशोक हांद्रे,किरण भंडारे, प्रकाशसिंह चौहाण, करणसिंह ठाकूर,किसनसिंह ठाकूर, विजयसिंह ठाकूर,गुमानसिंह ठाकूर,गणू भंडारे, नागराजसिंह चौहाण सतिशसिंह ठाकूर आदि शेतकरी उपस्थित होते.



## श्वेता सीताराम कांबळे एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण

**नांदेड** -श्वेता सीताराम कांबळे हिने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत एमबीबीएस (चइइड) पदवी पूर्ण केली आहे. तिने विलासराव देशमुख गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज येथे शिक्षण घेत परीक्षा दिली होती. या परीक्षेत यश मिळवत तिने एमबीबीएस पदवी संपादन केली आहे. श्वेताच्या या यशाबद्दल तीचे मामा हिमायतनगरचे पत्रकार शुद्धोधन हनवते, मामा प्रवीण हनवते, मामी तेजस्वी हनवते, वैशाली हनवते तसेच प्रणव कांबळे यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. श्वेताचे वडील सामान्य शिक्षक पदावर कार्यरत असून आपल्या दोन्ही मुलांनी वैद्यकीय क्षेत्रात करिअर करावे, असे त्यांचे स्वप्न होते. मुलीच्या रूपाने हे स्वप्न साकार झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच आता मुलालाही वैद्यकीय क्षेत्रात पाठविणार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, नुकत्याच झालेल्या बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत श्वेताचा भाऊ हिमायतनगर तालुक्यात प्रथम आला होता. त्यामुळे कांबळे कुटुंबाच्या शैक्षणिक यशाची परिसरात चर्चा होत असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## विष्णुपुरी येथे ७ दिवसीय शिवमहापुराण कथा महोत्सवास प्रारंभ

**नांदेड** -विष्णुपुरी येथील श्री सत्संग सेवा समिती, काळेश्वर यांच्या वतीने सात दिवसीय भव्य शिवमहापुराण कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार (दि. १४ जून) पासून सुरू होणारा हा धार्मिक सोहळा शनिवार (दि. २० जून) रोजी संपन्न होणार असून, दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवात शिवमहापुराणाचे अभ्यासक व प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. शिवम शुक्ल महाराज यांच्या रसाळ वाणीमधून शिवमहापुराणाचे निरूपण होणार आहे. भगवान शिवाच्या विविध लीला, धर्म, अध्यात्म, संस्कार व भक्तीचे महत्त्व कथेद्वारे भाविकांसमोर उलगडले जाणार आहे. कथेच्या पहिल्या दिवशी शिवमहापुराण माहात्म्य, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी नारदमोह, कुबेर यांचे पूर्वचरित्र, चौथ्या दिवशी सती चरित्र व शिव-सती विवाह, पाचव्या दिवशी पार्वती प्राकट्य व शिव-पार्वती विवाह सोहळा, सहाव्या दिवशी कार्तिकेय व श्रीगणेश प्राकट्य, तर सातव्या दिवशी त्रिपुरासुर वध, जालंधर उद्धार आणि भगवान शिवाच्या विविध अवतारांचे वर्णन करण्यात येणार आहे. कथा समाप्तीनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी श्री सत्संग सेवा समिती, काळेश्वरचे अध्यक्ष खा. भास्करराव पाटील खतगावकर यांच्यासह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. कार्यक्रमाचे आयोजन काळेश्वर सत्संग सभागृह, विष्णुपुरी (नांदेड) येथे करण्यात आले आहे. शिवभक्तांसाठी भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांची सात दिवसांची पर्वणीमाजी आमदार ओम प्रकाश पोकर्ण, धारोजीराव हंबर्डे, राजेंद्र शुक्ला, बालाजीराव हंबर्डे, किशोर उपाध्याय (शर्मा), नवल पोकर्ण आदींची उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी : भगवानराव आलेगावकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जुन -**

शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून ही योजनेतील जाचक अटी-शर्ती बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे. यामुळे लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट आहे. परिणामी संबंधित शासन निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे असे आलेगावकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

या योजनेत सन २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेले अल्पमुदत पीककर्जाची २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. परंतु ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. २०१९ साली राज्यातील सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घेतला होता. याचाच अर्थ यंदाच्या कर्जमाफीतून या ३३ लाख शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळणार नाही असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदरील योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाखाहून अधिक आहे त्यांनी एकवेळ समझोता (जढड) अंतर्गत २ लाखांवरील रक्कम भरली तरच त्यांना २ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी २०१९च्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे आणि सध्या त्यांचे कर्ज ५० हजाराहून अधिक आहे त्यांनी उर्वरित रक्कम भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील अटीनुसार ज्या शेतकऱ्यांनी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ यापैकी कोणत्याही दोन वर्षातील पीक कर्जाची वेळेत परतफेड केली असेल त्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. परंतु हा प्रोत्साहनपर लाभ मिळवण्यासाठी त्या शेतकऱ्याने सन २०२५-२६ आणि सन २०२६-२७ चे पीककर्ज भरले असणे आवश्यक असुन शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत. गेली तीनवर्षे सततची नपिकी, नैसर्गिक आपत्ती, शेतमालाचे कोसळलेले दर यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी कोणत्याही अटीशर्तीशिवाय सरसकट कर्जमाफी करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांनी जिल्हा अधिकारी यांच्या मार्फत राज्य सरकार कडे निवेदनाद्वारे केली आहे.

## इस्लापूर ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत संपन्न; निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १२ जुन -**

आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण गावाचे लक्ष लागून राहिलेल्या इस्लापूर ग्रामपंचायतीच्या सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम शुक्रवारी (दि. १२ जून) सकाळी ११ वाजता उत्साहपूर्ण आणि पारदर्शक वातावरणात पार पडला. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार सन २०२४, २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडत प्रक्रिया राबविण्यात येत असून त्याअंतर्गत इस्लापूर ग्रामपंचायतीतील पाचही वार्डांचे सदस्य पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

किनवट तालुक्यातील एकूण १३४ ग्रामपंचायतींपैकी १७ बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने इस्लापूर ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी पंचायत समिती किनवटचे विस्तार अधिकारी के. एच. गायकवाड यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या उपस्थितीत ग्राम महसूल अधिकारी शंकर मुंडे तसेच ग्रामपंचायत अधिकारी शंकर गर्दसवार यांनी नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली.

आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, माजी सदस्य, इच्छुक उमेदवार, ग्रामस्थ आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. कोणता वार्ड कोणत्या प्रवर्गासाठी राखीव होणार याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून गावात उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर आरक्षण जाहीर होताच अनेकांच्या राजकीय आकांक्षांना दिशा मिळाली तर काही इच्छुकांचे निवडणूक लढविण्याचे गणितच बदलल्याची चर्चा गावात रंगली.

विशेष म्हणजे यंदाच्या आरक्षणात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला प्रवर्गासाठी मोठ्या प्रमाणात जागा राखीव झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे व मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व अधिक प्रभावी होणार असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. अनेक नवोदित आणि युवा नेतृत्वालाही यामुळे संधी उपलब्ध होणार असून आगामी निवडणुकीत नवीन चेहरे पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वार्ड क्रमांक १- अनुसूचित जमाती (महिला),सर्वसाधारण, सर्वसाधारण, वार्ड क्रमांक २-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, सर्वसाधारण (महिला), वार्ड क्रमांक ३- अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), सर्वसाधारण, वार्ड क्रमांक ४- अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), सर्वसाधारण (महिला), वार्ड क्रमांक ५-अनुसूचित जमाती, सर्वसाधारण (महिला) सर्वसाधारण

आरक्षण निश्चित झाल्यानंतर आता इस्लापूर ग्रामपंचायत निवडणुकीच्या राजकीय हालचालींना वेग येणार असल्याचे चित्र दिसत आहे. विविध राजकीय गटांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू झाली असून संभाव्य उमेदवारांनीही मतदारांशी संपर्क वाढविण्यास सुरुवात केल्याची माहिती समोर येत आहे. काही वार्डांमध्ये चुरशीच्या लढती होण्याची शक्यता वर्तविली जात असून अनेक ठिकाणी नव्या नेतृत्वाला संधी मिळणार असल्याने निवडणुकीत रंगत वाढणार आहे.

गावाच्या विकासाचे प्रश्न, मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, शिक्षण आणि युवकांच्या अपेक्षा या मुद्द्यांवर यंदाची निवडणूक केंद्रित राहण्याची शक्यता आहे. आरक्षण सोडतीनंतर आता गावातील राजकीय वातावरण अधिकच तापले असून आगामी काही महिन्यांत इस्लापूर ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## आ. भीमराव केराम यांच्या हस्ते डि.व्ही. भालेराव ग्रंथालयाचे लोकार्पण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १२ जुन -**

पोलीस दलातील एक कर्तव्यदक्ष अधिकारी आणि साहित्याचे गाढे अभ्यासक स्व.डी. व्ही. भालेराव सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी किनवट शहरात उभारण्यात आलेल्या डि. व्ही. भालेराव ग्रंथालयाचा लोकार्पण सोहळा ९ जून रोजी आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते संपन्न झाला .यावेळी व्यासपीठावर गेंदाबाई सोपान सूर्यवंशी, मथुराबाई विठ्ठल भोगे आणि नंदाबाई दत्तात्रय भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रामप्रसाद तौर व प्रा. डॉ. मारोती कसाब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ड. सुभाष ताजणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश कराड, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे आणि डॉ. पंजाब शेरे उपस्थित होते.

**वडिलांचा वैचारिक वारसा जपण्याचा स्तुत्य उपक्रम**

स्व. डी. व्ही. भालेराव हे केवळ एक पोलीस अधिकारी नव्हते, तर ते साहित्याचे व्यासंगी आणि प्रगल्भ वाचक होते. कोरोनाच्या कठीण काळात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या विचारांची श्रीमंती आणि वाचनाचा छंद जिवंत ठेवण्यासाठी त्यांचे चिरंजीव दीपक भालेराव, कन्या प्रा. डॉ. पूजा भालेराव आणि जावई व्यंकटेश कुंभार यांनी या ग्रंथालयाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. भालेराव परिवाराने स्वतः या ग्रंथालयाचा संपूर्ण आर्थिक भार उचलून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

**विद्यार्थ्यांसाठी हक्काचे विचारांचे विद्यापीठ**

हे ग्रंथालय स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी, तरुण-तरुणी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्ञानाचे हक्काचे केंद्र ठरेल. हे केवळ एक वाचनालय नसून ते विचारांचे विद्यापीठ व्हावे, असा मानस आयोजकांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. पूजा नंदा दत्तात्रय भालेराव यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. धनराज हलवले आणि प्रा. धनराज पेंदोर यांनी केले.

या सोहळ्याला माजी नगराध्यक्ष के. मूर्ती,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, मारोती सुंकलवाड, प्रशांत कोरडे, ड. मिलिंद सरपे, यांच्यासह किनवटमधील वाचकप्रेमी, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

## रावसाहेब विठ्ठलराव पाटील शिंदे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १२ जुन -**



तालुक्यातील मौजे गणिपूर येयिल जेष्ट नागरीक तथा माजी पोलीस पाटील सोमठाणा व सेवा सहकारी सोसायटी सोमठाणा चे सदस्य रावसाहेब विठ्ठलराव पाटील गणीपूरकर यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दिनांक ९ मे २०२६ रोज मंगळवारी ५:३० वाजता यांचे दुःखद निधन झाले . अंत्यविधी दिनांक १० मे २०२६ दुपारी १ : ०० वाजता गणिपूर येथे करण्यात आले . त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा , नातवंड असा परिवार आहे माजी उमरी शिवसेना तालुका प्रमुख तथा माजी समन्वय समितीचे अध्यक्ष साहेबराव पाटील शिंदे यांचे ते वडिल होत.

# नांदेड येथे पीएलएफएस व एएसयुएसई राष्ट्रीय सर्वेक्षणाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जुन -**

सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय (चेड्झख), भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत चरहरडढठखअए प्रकल्पांतर्गत राज्यात जून २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (झडऱ्ड) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (डणडए) राबविण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणांच्या कामाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे विमोचन करून करण्यात आला.



यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सांख्यिकी अधिकारी श्रीमती प्रज्ञा पांढरे तसेच अन्वेषक आणि पर्यवेक्षक उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या धर्तीवर अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन या सर्वेक्षणात सहभागी होत आहे. या सर्वेक्षणातून मिळणारी आकडेवारी शासनाच्या विविध योजना आणि धोरणे तयार करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

PLFS सर्वेक्षणातून रोजगार-बेरोजगारी, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार आणि असंघटित रोजगार याबाबत अद्ययावत व विश्वासार्ह माहिती उपलब्ध होणार आहे.

SUSE सर्वेक्षणातून उत्पादन (Manufacturing), व्यापार (Trade) आणि सेवा (Services) क्षेत्रातील (बांधकाम क्षेत्र वगळून) असंघटित उद्यमांची संख्या, रोजगाराचे प्रकार (पगारी/स्वयंरोजगारी), कार्यरत कामगारांची संख्या, प्रति कामगार व प्रति उद्यम स्थूल मूल्यवृद्धी (GV), उत्पादकता आणि वेतन यांसारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक निर्देशकांची माहिती प्राप्त होणार आहे.

या माहितीच्या आधारे राज्य व जिल्हा उत्पन्नाचा अंदाज बांधणे तसेच शासनाच्या नियोजन व धोरणनिर्मितीस मदत होणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी डॉ. गायकवाड यांनी सांगितले. त्यांनी नागरिकांना सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सर्वेक्षणासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत खींी ठशीशरीलह झीर्ळींरीश डळाळींशव या संस्थेने नियुक्त केलेले अन्वेषक व पर्यवेक्षक निवडक नमुना पद्धतीने निवडलेल्या कुटुंबे आणि उद्योगांना भेट देऊन मुलाखतीद्वारे माहिती संकलित करणार आहेत. संकलित करण्यात येणारी वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य व परिपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे आणि जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने सांख्यिकी अधिकारी प्रज्ञा पांढरे यांनी केले आहे.

## शिवाजी नागरी बँकेस रत्न सहकारिता पुरस्कार




तभा वृत्तसेवा

**पैठण दि ११ :-** शिवाजी नागरी बँक राष्ट्रीय स्तरावर भारतरत्न सहकारीता पुरस्कार 2026 ने सन्मानित करण्यात आले.

नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को ऑपरेटीव्ह बँक्स नवी दिल्ली (NAFCUB) व 'भारत को-ऑपरेटीव्ह बँकिंग समिट पुरस्कार २०२६ लखनौ 'उत्तर प्रदेश येथे आयोजित केला होता. या मध्ये शिवाजी नागरी बँकेस भारत रत्न सहकारिता सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या परिषदेत भारतातून विविध नागरी सहकारी बँकांनी आणि असोसिएशनने भाग घेतला होता. या परिषदेमध्ये भारत नेटवर्क ग्रुप यांच्या तर्फे मा. आमदार बिस्वजित फुकन, अध्यक्ष, आसाम स्टेट एपेक्स कोऑपरेटिव्ह बँक लि., आसाम यांच्या हस्ते शिवाजी नागरी सहकारी बँकेस तीन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, यामध्ये बँकेस ''Best urban co op bank'' बँकेचे चेअरमन रवींद्र शिवाजीराव काळे यांना ''Best chairperson of the year'' आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई .आय .पठाण यांना ''Best CEO of the year'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या प्रसंगी लखनौ येथे महाराष्ट्र को बँक फेडरेशन चे अजय ब्रम्हेच्या ,पुणे बँक असोसिएशन चे ॲड.मोहिते बँकेचे संचालक. गणेश शिलवंत (CA ),बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणपत म्हस्के उपस्थित होते.

## समर ऑफर्ससह 'द बिग बीस्पोक एआय फेस्ट'ची घोषणा

**गुरुग्राम :** सॅमसंग इंडियाने आज द बिग बीस्पोक एआय फेस्टची घोषणा केली आहे. हा फेस्ट १२ जून ते १९ जुलै २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. या फेस्टदरम्यान कंपनीच्या बीस्पोक एआय होम अप्लायन्सेस पोर्टफोलिओवर आकर्षक समर डील्स उपलब्ध असतील. या उन्हाळ्यात एआय-सज्ज आधुनिक जीवनशैलीचा आनंद घेणे ग्राहकांसाठी अधिक सुलभ व्हावे, यासाठी निवडक बीस्पोक एआय रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, एअर कंडिशनर्स आणि इतर होम अप्लायन्सेसवर ग्राहक २०,००० रूपयांपर्यंत कॅशबॅक आणि विस्तारित वॉरंटी फायद्यांचा आनंद घेऊ शकतात. या ऑफरसाठी पात्र असलेले रेफ्रिजरेटर्स आणि वॉशिंग मशिन्स खरेदी करणाऱ्या ग्राहकांना एक वर्षाच्या विस्तारित वॉरंटीचे पैसे भरून सॅमसंग केअर+ च्या माध्यमातून अतिरिक्त दोन वर्षांची वॉरंटी मोफत मिळू शकते. तसेच, सिंगल डोअर रेफ्रिजरेटर्ससाठी ग्राहक फक्त ९९ रूपयांमध्ये एक वर्षाची विस्तारित वॉरंटी मिळवू शकतात.

## नोव्हा 2 निओआणि प्रो किरकोळ विक्रीपूर्वीच परीक्षण केले"

**नवी दिल्ली :** "एक तरुण ब्रँड म्हणून, आम्ही अजूनही शिकत आहोत, सुधारत आहोत आणि दररोज ग्राहकांचा विश्वास संपादन करत आहोत. जर आम्ही काही चुकवले असेल, तर ग्राहकांनी पैसे खर्च करण्यापूर्वी परीक्षकांकडून ते ऐकणे आम्हाला अधिक योग्य वाटते. म्हणूनच हे अभिप्राय विंडो पूर्ण होईपर्यंत नोव्हा 2 निओआणि नोव्हा2 प्रो विक्रीस येणार नाहीत." असे त्यांनी पुढे नमूद केले माधव शेठ. उपकरण मिळाल्यानंतर ७ दिवसांच्या आत परीक्षक त्यांचे मते तत्काळ आणि स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यास मुक्त असतील. सकारात्मक अभिप्राय, टीकात्मक अभिप्राय आणि त्यांच्यामधील सर्व काही पारदर्शकता आणि सतत सुधारणेप्रती ब्रँडच्या वचनबद्धतेचा भाग म्हणून स्वागतार्ह असेल. सर्वांना अभिप्राय पाहता यावेत यासाठी परीक्षणे ब्रँडच्या वेबसाइटवर वास्तवकाळात उपलब्ध असतील. हा उपक्रम एआय प्लस स्मार्टफोन च्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे: उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि ऐकण्याच्या इच्छाशक्तीद्वारे तंत्रज्ञानाचे भविष्य घडवले पाहिजे.

## 'कॉस्मो फर्स्ट'मध्ये पीयूष गुप्ता यांची पदोन्नती

**नवी दिल्ली, ११ जून २०२६ :** स्पेशालिटी फिल्म्स आणि प्रगत मटेरियल सोल्युशन्स तयार करणाऱ्या कॉस्मो फर्स्ट लिमिटेड या आघाडीच्या कंपनीने आपली पूर्ण मालकी असलेल्या कॉस्मो स्पेशालिटी केमिकल्स प्रा. लि. या उपकंपनीच्या बिझनेस हेडपदी पीयूष गुप्ता यांची नियुक्ती केली आहे. गुप्ता हे या नव्या जबाबदारीसोबतच कंपनीच्या कॉस्मो फिल्म्स विभागासाठी जागतिक विक्री आणि मार्केटिंगविषयक काही जबाबदाऱ्याही सांभाळणार आहेत.'कॉस्मो स्पेशालिटी केमिकल्स'चे बिझनेस हेड म्हणून पीयूष गुप्ता यांच्याकडे कंपनीच्या व्यवसाय विस्ताराची जबाबदारी असेल. तसेच विकासाची दीर्घकालीन धोरणे आखणे, नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करणे आणि विद्यमान ग्राहकवर्गाचा विस्तार करणे यांवरही त्यांचा भर असेल.

## विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृहाची सुविधा सुरू

**नाशिक :** प्रत्येक मुलाच्या आयुष्यात असा एक टप्पा येतो, जेव्हा त्याची खरी जडणघडण केवळ वर्गखोलीत नव्हे तर तिच्या बाहेर सुरू होते. ही वाढ फक्त गुण किंवा शैक्षणिक यशापुरती मर्यादित नसून जबाबदारी, आत्मविश्वास, शिस्त, भावनिक स्थैर्य आणि स्वावलंबन यांच्याशीही संबंधित असते. आजच्या डिजिटल युगात मुलांना स्क्रीन, सोशल मीडिया आणि विविध विचलनांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत दिल्ली पब्लिक स्कूल नाशिकने इयत्ता सहावी ते बारावीतील मुलांसाठी निवासी वसतिगृहाची सुविधा सुरू केली आहे. हे वसतिगृह केवळ राहण्याची व्यवस्था नसून विद्यार्थ्यांसाठी दुसरे घर आहे. येथे विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध, सुरक्षित आणि काळजीपूर्वक वातावरणात राहण्याची संधी मिळते. निसर्गाच्या सान्निध्यात राहून आरोग्यदायी सवयी विकसित करण्यास, जबाबदारी स्वीकारण्यास आणि स्वप्रेरणेने शिकण्यास प्रोत्साहन दिले जाते.

## नांदेड जिल्ह्यासाठी नारायण लक्ष्मण संगेवार यांना 'महाधन योद्धा पुरस्कार २०२६'

नांदेड-प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन ॲग्रीटेक लिमिटेड (एमएएल) तर्फे नांदेड,जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील सरपंच नारायण लक्ष्मण संगेवार यांना सोयाबीन लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार – 2026' प्रदान करण्यात आला.ए. के. संभाजी मंगल कार्यालय, पावडे वाडी, नांदेड येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## अनअकॅडमी सोलापुर केंद्र कायमस्वरूपी बंद

सोलापुर - विद्यार्थी, पालक तसेच सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, अनअकॅडमी केंद्र, सोलापुर हे कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे. कृपया याची नोंद घ्यावी की, यापुढे अनअकॅडमीच्या नावाने कोणत्याही प्रकारचे विद्यार्थी प्रवेश किंवा इतर उपक्रम राबविण्यात येणार नाहीत. तसेच, या बंदीनंतर सोलापुर येथे करण्यात आलेल्या कोणत्याही प्रवेश, संचालन किंवा दाव्यांशी अनअकॅडमीचा कोणताही संबंध अथवा जबाबदारी राहणार नाही.

# रस्त्यावर फळगाड्या, वाहने लावणाऱ्यांवर पोलिसांचा बडगा; सहा जणांवर गुन्हे दाखल

तभा वृत्तसेवा

**कन्नड, दि. ११ जून :** शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि रहदारीस होणारा अडथळा लक्षात घेऊन कन्नड शहर पोलिसांनी कडक कारवाईचा इशारा दिला आहे. दि.११ रोजी रस्त्यावर फळगाड्या उभ्या करणे तसेच दुचाकी व चारचाकी वाहने बेशिस्तपणे पार्क करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केली असून सहा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

बसस्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर हातगाड्यांवर फळविक्री करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे तसेच रस्त्यावर वाहने उभी करणाऱ्या व्यक्तींविरोधात कन्नड शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये योगेश राठोड (रा. कोळवाडी), माधवलाल गाढरी (सावरिया आईस्क्रीम गाडी चालक), लक्ष्मण जाधव (रा. बोरसर), अय्युब अली मोहम्मद अली (रा. मेहताबनगर, कन्नड), नाजीम खान जब्बार खान (रा. काजी मोहल्ला, कन्नड) आणि मुस्तकीम खान नासिर खान (रा. सिद्दीक चौक, कन्नड) यांचा समावेश आहे.

या सर्वांवर रहदारीस अडथळा निर्माण करणे तसेच नागरिकांच्या जीवितास धोका पोहोचेल अशा प्रकारे वर्तन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे, सहाय्यक फौजदार नासेर पठाण तसेच पोलीस अंमलदार विजय चौधरी, दिनेश खेडकर आणि सागर सुलाने यांच्या पथकाने केली.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## एनसीसी प्रशिक्षणात यश; डॉ. विजय मातकर यांना 'लेफ्टनंट' पद प्रदान

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.११ जून - शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) संचालक डॉ. विजय मातकर यांनी नागपूर (कामठी) येथील एनसीसी ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी (ओटीए) येथे पार पडलेल्या तीन महिन्यांच्या कठोर प्रशिक्षणात उल्लेखनीय यश संपादन केले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना एनसीसीमध्ये



'लेफ्टनंट' हे मानाचे पद प्रदान करण्यात आले आहे.

देशभरातील निवडक प्राध्यापकांना या प्रतिष्ठित प्रशिक्षणासाठी संधी दिली जाते. ५ जानेवारी ते ४ एप्रिल या कालावधीत झालेल्या प्रशिक्षणात शारीरिक क्षमता विकास, लष्करी विषयांचे अध्ययन, शस्त्रास्त्र हाताळणी, फायरिंग तसेच विविध सैनिकी कौशल्यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात डॉ. मातकर यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदविली. याशिवाय छत्रपती संभाजीनगर येथील ५० महाराष्ट्र बटालियनच्या सीनियर डिव्हिजनमध्ये पीआरसीएनमध्ये 'अ' दर्जा प्राप्त करून त्यांनी आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने डॉ. विजय मातकर यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे प्रमुख मानसिंह पवार यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे अखंड श्रीराम नाम जप ची ह.भ.प. अनिल महाराज तुपे यांच्या काल्याचे किर्तनाची सांगता

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद, प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र नाथ आश्रम, वेरूळ येथे प.पू. साध्वी सद्गुरू नाथयोगिनी श्री आक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात होते हा धार्मिक सोहळा अधिक ज्येष्ठ शुद्ध ८, शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी प्रारंभ होऊन अधिक ज्येष्ठ शुद्ध १५, शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी काल्याचे किर्तन सांगता करण्यात आली



या राम नाम जपा मध्ये. २०० भाविक भक्तांनी दैनंदिन भाग घेऊन सात लक्ष राम नाम जप करून एक अखंड सेवेचा नाथ आश्रम या ठिकाणी उच्चांक केला ह भ प अनिल महाराज तुपे यांनी या श्रीराम जपानच्या बाबतीत किर्तन सेवेदरम्यान आपल्या रसाळ वाणीतून श्रीराम प्रभू चे विचार आचार आपल्या दैनंदिन जीवनात आणून व्यसनापासून दूर राहा साधुसंतांची संगत करा जीवनाची कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही असे म्हटले

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी आरती, विष्णू सहस्रनाम, हनुमान चालीसा, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन सेवा, भजन आणि रात्री हरिजागर यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात . आले

विविध भागांतील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व भजनी मंडळी या कार्यक्रमात सहभागी झाली होती

कार्यक्रमाच्या प्रारंभी दि. ५ जून रोजी ह.भ.प. गणेश महाराज नावडे (आळंदी) यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर ह.भ.प. महेश महाराज गलांडे (वेरूळ), ह.भ.प. गोपाळ महाराज (चिंचोली), ह.भ.प. कृष्णा महाराज चव्हाण (वेरूळ), ह.भ.प. संदीप महाराज पेकळवाडीकर, ह.भ.प. कल्याण महाराज पुंजा (बाजारनगर) आणि ह.भ.प. संतोष महाराज भोसले (गोळेगाव, ता. गंगापूर) यांची कीर्तन सेवा होणार आहे.

## पाठपुराव्याला यश; लंगडातांडा येथील राठोड कुटुंबास 5 लाखांची मदत

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.११ जून - तालुक्यातील लंगडातांडा येथील स्वर्गीय विलास बुधा राठोड यांच्या कुटुंबाला गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या वतीने ५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली असून ही मदत कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आली. या प्रकरणात मनसेचे विधानसभा अध्यक्ष प्रा. लखन चव्हाण यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याची भावना व्यक्त होत आहे.



दोन वर्षांपूर्वी बैल चारत असताना पाय घसरून तलावात पडल्याने विलास राठोड यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली तसेच वृद्ध आई-वडील असा परिवार असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. कर्ता पुरुष गमावल्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळले होते.

ही बाब लक्षात घेऊन प्रा. लखन चव्हाण यांनी राठोड कुटुंबीयांची भेट घेत त्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. या प्रक्रियेत तुळजाभवानी ऊसतोड कामगार संघटना महाराष्ट्राचे अध्यक्ष सुरेश पवार, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष राजू पवार तसेच लंगडातांडा येथील शिवाजी राठोड यांनी मोलाचे सहकार्य केले. मंजूर झालेल्या मदतीचा धनादेश गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत स्वर्गीय विलास राठोड यांच्या पत्नी व वडील बुधा राठोड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी प्रा. लखन चव्हाण, राजू पवार, शिवाजी राठोड, खुशाल राठोड, शंकर राठोड, पंडित राठोड, जयलाल चव्हाण, नामदेव चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी राठोड कुटुंबीयांनी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रा. लखन चव्हाण, सुरेश पवार, राजू पवार व शिवाजी राठोड यांचे आभार मानले. सामाजिक बांधिलकी जपत गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचे कार्य पुढेही सुरू राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## राष्ट्रीय शल्यचिकीत्सक सप्ताहानिमीत्त घाटीत शल्यचिकीत्साशास्त्र विभागातर्फे रक्तदान शिबीर

### रक्ताचा तुटवडा असताना रक्तपेढीला मिळाला आधार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** रक्तदान हे जीवनदान हे आपण म्हणतो, मात्र उन्हाळा आणि सुट्यामध्ये रक्तटंचाई नेहमी जाणवते. ही दखल घेऊन आणि संपूर्ण भारत देशात 9 जून ते 15 जून हा आठवडा राष्ट्रीय शल्यचिकीत्सक सप्ताह म्हणुन साजरा केला जातो. या सप्ताहानिमीत्त घाटी रुग्णालयातील शल्यचिकीत्साशास्त्र विभाग व सर्जीकल सोसायटीतर्फे गुरुवार, 11 रोजी रक्तदान शिबीर आयोजीत केले. सदरील शिबीराचे उदघाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी या रक्तदान शिबीरात एकुण 27 रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. "रक्तदान हेच सर्व श्रेष्ठदान" हे या शल्यचिकीत्सक सप्ताहाचे ब्रिद वाक्य आहे. रुग्णालयात रक्त पुरवठयाची नेहमीच आवश्यकता असते. गरजु रुग्णांना रक्तपुरवठा तात्काळ उपलब्ध करण्याकरिता या रुग्णालयातील रक्तपेढी दिवस-रात्र प्रयत्न करत असते. आयोजित शिबीरात उपअधिष्ठाता तथा विभागप्रमुख विकृतीशास्त्र विभाग डॉ. भारत सोनवणे, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुचीता जोशी, शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख डॉ. सरोजीनी जाधव, सहयोगी प्राध्यापक डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. मनीष मालाणी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षा अधिकारी सुरेश भाले आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी सर्जीकल सोसायटीचे सचिव डॉ. पंकज वैरागड यांनी समन्वयाचे काम केले. विभागातील निवासी डॉक्टर डॉ. प्रियेश, डॉ. अंजल, डॉ. अमेय, डॉ. प्रणव यांनी शिबीरासाठी योगदान दिले. तसेच आध्यापक, निवासी डॉक्टर्स व विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन शिबीर यशस्वी केले. रक्तपेढील सर्व बीटीओ, स्टाफ यांनी रक्तदान शिबिरासाठी परिश्रम घेतले.

## नवीन कोडियाक आरएस २२ जूनपासून बुकिंगसाठी उपलब्ध

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** स्कोडा ऑटो इंडियाने आपल्या परफॉर्मन्स-केंद्रित आरएस पोर्टफोलिओचा विस्तार करत नवीन कोडियाक आरएस एसयूव्ही लॉँच करण्याची घोषणा केली आहे. या बहुप्रतीक्षित सात-सीटर लक्झरी एसयूव्हीसाठी २२ जून २०२६ पासून बुकिंग सुरू होणार आहे.



स्कोडाच्या ५० वर्षांहून अधिक जुन्या आरएस वारशावर आणि १२५ वर्षांपेक्षा अधिकच्या मोटरस्पोर्ट परंपरेवर आधारित कोडियाक आरएस ही कंपनीची भारतातील पहिली सात-सीटर आरएस एसयूव्ही ठरणार आहे. दमदार परफॉर्मन्स, ४x४ तंत्रज्ञान, ऑल-टेरेन क्षमता आणि प्रशस्त इंटिरिअर यांचा संगम या मॉडेलमध्ये पाहायला मिळणार आहे.

या घोषणेबाबत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता यांनी सांगितले की, आरएस बॅज हा जागतिक परफॉर्मन्स वारशाचे प्रतीक असून भारतातील ग्राहकांमध्ये त्याला विशेष प्रतिसाद मिळाला आहे. कोडियाक आरएसच्या माध्यमातून कंपनी परफॉर्मन्स, बहुपयोगिता आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचे प्रभावी मिश्रण ग्राहकांसमोर आणत आहे.

'रॅली स्पोर्ट' या संकल्पनेवर आधारित आरएस मालिका जागतिक स्तरावर तिच्या डायनॅमिक क्षमता आणि रोमांचक ड्रायव्हिंग अनुभवासाठी ओळखली जाते. कोडियाक आरएसच्या माध्यमातून स्कोडा भारतीय लक्झरी एसयूव्ही विभागात अधिक वेगवान आणि सक्षम पर्याय सादर करत आहे.

मोटरस्पोर्टशी असलेली दीर्घ परंपरा जपत स्कोडाने अलीकडेच आपल्या विविध मॉडेल्सच्या साहाय्याने 'एका उत्पादकाकडून सर्किटवर सर्वात वेगवान मल्टी-कार रिले' हा विक्रमही नोंदविला आहे. कोडियाक आरएस ही स्कोडाच्या रेसिंग डीएनए, अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि ऑल-टेरेन क्षमतांची सर्वोच्च अभिव्यक्ती मानली जात आहे.

## सोयगाव तालुक्यातील नांदगाव येथे बाल आरोग्य तपासणी संपन्न



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१२ जून :** तालुक्यातील नांदगाव येथील अंगणवाडीत प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत बाल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी डॉ.झाकी यांनी आरोग्य तपासणी करून २० बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.यावेळी संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी तालुक्यात सर्वत्र अंगणवाड्यात आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. असून त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात येणार आहे. डॉ.पठाण यांनी याप्रसंगी बालकाच्या मातांना मार्गदर्शन केले.अंगणवाडी सेविका संगीता परदेशी,कविता चव्हाण, तसेच मदतनीस यांची उपस्थिती होती.

## श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१२ जून :** श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा ता.सोयगाव यांची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि.२६ शुक्रवार रोजी सकाळी १०:३० वाजता हॉटेल अमृत इन (गार्डन) सोयगाव-जरंडी रोड कंकराळा पासून १.५. कि.मी.अंतरावर संस्थेचे अध्यक्ष ॲड.राजेश(भैय्या)अमृत गिरी यांच्या अध्यक्षतेखालील ठेवण्यात आली आहे.सदर सभे मध्ये मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे, सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,सन.२०२५-२६ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिता संचालक मंडळाची शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास वाचून मंजुरी देणे,नफा विभागणी व लाभांश वाटपास मान्यता देणे,सन.२०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता लेखा परीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,अशा ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करणे बाबत,व या पतसंस्थांच्या मार्फत सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी अंतर्गत संस्थेचे काही ठळक उपक्रम संस्थेने जि.प.कन्या प्रशाला सोयगाव यांना डिजिटल व्हच्युअल रुम साठी निधी दिला,हनुमान मंदिर रामजीनगर वॉल कंपाऊंड जाळीसाठी निधी दिला,माळेगांव पिंप्री येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासाठी आवश्यक त्या लाईट फिटिंग साठी निधी दिला,गलवाडा येथील विठ्ठल रुक्मिणनी प्राणप्रतिष्ठेस निधी दिला,अशा अनेक ठिकाणी संस्थेमार्फत सामाजिक उपक्रमात निधीची तरतूद करून वितरीत केला जातो असे यावेळी सांगितले.तसेच संस्थेचे संचालक,सभासद,प्रमुख पाहुणे हे उपस्थित राहतील असल्याची माहिती श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा ता.सोयगाव अध्यक्ष श्री.स्वामी समर्थ ॲड राजेश (भैय्या) गिरी,पतसंस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर पाटील,कॅशियर सुनील सैंदाने, गणेश पवार यांनी सांगितले.

## एमजीएम आणि नॉर्थ बेंगळुरू विद्यापीठात सामंजस्य करार संपन्न

### शैक्षणिक सहकार्य आणि संशोधनासाठी महत्त्वपूर्ण भागीदारी



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि कर्नाटक राज्यातील नॉर्थ बेंगळुरू विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नवकल्पना, संशोधन व सहकार्य यांना चालना देणारा हा करार दोन्ही संस्थांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला.

विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये सामंजस्य करारावर नॉर्थ बेंगळुरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.बी.के.रवी आणि एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारामध्ये शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त उपक्रम, भाषा विकास, प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि संशोधन प्रकल्प राबवण्यावर भर देण्यात आला आहे.

या सामंजस्य कराराच्यावेळी कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, अधिष्ठाता जॉन चेल्लादुराई, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

करारानुसार दोन्ही विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे आदानप्रदान, संयुक्त कार्यशाळा व परिषदा, स्टार्टअप व इनोव्हेशन उपक्रम, कौशल्य व प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व करिअरच्या संधी देण्यासाठी या कराराचा उपयोग होणार आहे. यामुळे दोन्ही विद्यापीठांचे शैक्षणिक पातळीवरील सहकार्य अधिक सशक्त होईल आणि विविध उपक्रम येत्या काळामध्ये हाती घेता येणार आहेत.

### जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम, सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड़ यांच्या न्यायालयात,**

दि.कि. अर्ज क्र २२१/२०२६ पुढील तारीख २८/०७/२०२६

अर्जदार : १) योगेश लक्ष्मण काळे, वय ४२ वर्षे, धंदा- शेती, रा. जैतापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) सदाशिव लक्ष्मण काळे, बय- ४० वर्षे धंदा- शेतो, रा. जैतापुर, ता. कन्नड जि, औरंगाबाद ३) बबनचाई भ. लक्ष्मण काळे, वय ७६ वर्ष, धंदा- घरकाम, रा. जैतापूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : Bombay Regulation Act १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ आर. एम. नरोटे यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळविण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जबार क्र. ९ व २ हे आपसातु सख्खे भाऊ आहे व अर्जदार क्र. ३ त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३. यांचे पती नामे लक्ष्मण भवानी काळे हे होते ते दिनांक १५/०३/२०२६ रोजी उपचारादरम्यान शासकिय रुग्णालय छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ व २ यांचे आजी व आजोबा, अर्जदार क्र. ३ यांचे सासु च सासरे म्हणजेच मयत लक्ष्मण भवानी काळे यांचे आई व वडील नामे भवानी सुका काले व गंगुबाई भवानी काळे हे दोघे पुर्वीच मयत झालेले आहे, सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत लक्ष्मण भवानी काळे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसांची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालयात, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शासकिय, निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाजे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यासाठी अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे एकमेव वारस असून अर्जदार क्र. १ ते ३ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही, वारस प्रमाणपत्र देखील घेतलेले नाही,

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात बारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

दिनांक ११/०६/२०२६

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड